पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १६९ ■ शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 /49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




# मुंबईसाठी महायुतीचा फॉर्म्युला ठरला !

## भाजप १४०, शिवसेना ८७; राष्ट्रवादी (अजित पवार) स्वतंत्र लढणार

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**मुंबई :** आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून भाजप आणि शिवसेनेत जागावाटपासाठी चर्चेच्या फेऱ्या सुरु आहेत. या चर्चेअंती आता भाजप आणि शिंदे सेनेच्या मुंबईतील जागावाटपाचा नवा फॉर्म्युला समोर आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, मुंबई महापालिका निवडणूक २०२६ साठी महायुतीचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाला आहे. त्यानुसार मुंबई महापालिकेच्या २२७ जागांपैकी भाजप १४० आणि एकनाथ शिंदेंची शिवसेना ८७ जागा लढवणार असल्याची माहिती मिळत आहे. या महापालिकेमध्ये महायुतीतील अजित पवारांची राष्ट्रवादी स्वतंत्र लढणार आहे. त्यामुळे भाजप आणि शिवसेना मिळून २२७ जागा लढवणार आहेत. याबाबतची अधिकृत घोषणा आता कधी होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. यापूर्वी जागावाटपाच्या पहिल्या बैठकीत भाजपने मुंबईत शिंदे गटासाठी फक्त ५२ जागा सोडण्याची तयारी दाखवली होती. मात्र, ठाकरे बंधूंच्या युतीनंतर भाजपने आता शिवसेनेला जास्त जागा देऊ केल्या होत्या. परंतु, जागावाटपच्या या सूत्रावर अधिकृतरित्या शिक्कामोर्तब कधी होणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.



| २०१७ चे पक्षीय बलाबल | |
|---|---|
| शिवसेना | - ८४ |
| भाजपा | - ८२ |
| काँग्रेस | - ३१ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | - ०९ |
| मनसे | - ०७ |
| समाजवादी पक्ष | - ०६ |
| एमआयएम | - ०२ |
| अपक्ष | - ०५ |

## पुण्यातील भाजपची यादी आज होणार जाहिर

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**पुणे :** राज्यातील महानगरपालिकांच्या अनुषंगाने बैठका, चर्चा, जागावाटप यांना वेग आला आहे, अशातच पुण्यात भाजप यादीवर मुख्यमंत्र्यांचे शिक्कामोर्तब झाल्याची माहिती समोर आली आहे. भाजपची आज पहिली यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपची पहिली यादी काल रात्री उशिरा अंतिम करण्यात आली आहे. शंभरहून अधिक नावावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती आहे. मुख्यमंत्री फडणवीस या यादीतील नावांना मान्यता देऊन आज ही यादी जाहीर होण्याची शक्यता आहे.

## सोलर पॅनल लावलेल्या ग्राहकांची फसवणूक

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अकोला:** एकीकडे केंद्र आणि राज्य सरकार 'पंतप्रधान सूर्यघर योजने'च्या माध्यमातून घराघरांत सौर ऊर्जा पोहोचवण्यासाठी कोट्यवधींच्या जाहिराती करत आहे, तर दुसरीकडे महावितरणच्या सावळ्या गोंधळामुळे सोलर पॅनल लावलेले ग्राहक अक्षरशः नागवले जात आहेत. सोलर लावून वीज बिल 'झिरो' येण्याऐवजी, ग्राहकांना तीन-तीन महिन्यांचे एकत्रित अव्वाच्या सव्वा बिल येत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तशी ओरड सोलर घरगुती आणि व्यावसायिक ग्राहकांची आहे.

सलग तीन महिने बिले न आल्यामुळे आणि आता एकदम मोठी रक्कम आल्यामुळे मध्यमवर्गीय ग्राहकांचे बजेट कोलमडले आहे.ष्अधिकारी सुस्त, जनता त्रस्त: तक्रार निवारण केंद्रावर गेल्यावर तांत्रिक बिघाडाचे कारण देऊन अधिकारी जबाबदारी झटकत आहेत.

या विषयावर महावितरणची प्रतिक्रिया घेण्याचा प्रयत्न केला असता जनसंपर्क अधिकारी उपलब्ध झाले नाही.

### रीडिंग 'शून्य', तरीही बिल हजारो रुपये!

सोलर पॅनल लावल्यानंतर नियमानुसार 'नेट मीटर' बसवणे अनिवार्य आहे. हे मीटर महावितरणकडून मिळते. मात्र, अनेक ग्राहकांच्या तक्रारी आहेत की, त्यांच्या नेट मीटरमध्ये रीडिंग '००' (शून्य) दिसत असूनही महावितरणच्या सॉफ्टवेअरमध्ये मात्र भरमसाठ बिल जनरेट होत आहे. तीन महिन्यांपासून बिलात कोणतीही सवलत न मिळाल्याने 'सोलर लावून गुन्हा केला का?' असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. किती वीज निर्मिती झाली अर्थात जनरेशन झाले.

### स्मार्ट मीटरची जबरदस्तीः ग्राहकांच्या जखमेवर मीठ!

एकीकडे सोलर ग्राहकांचे प्रश्न सुटत नसताना, महावितरण आता ग्राहकांच्या माथी 'स्मार्ट मीटर' मारण्यासाठी सक्ती करत आहे. जुने मीटर व्यवस्थित सुरू असतानाही, केवळ कंत्राटदारांचे खिसे भरण्यासाठी स्मार्ट मीटरची सक्ती केली जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. या स्मार्ट मीटरच्या अचूकतेवर आधीच प्रश्नचिन्ह असताना, महावितरणच्या या दादागिरीमुळे ग्राहकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

'सरकार म्हणते सौर ऊर्जा वापरा, पण महावितरणचे नियम आणि त्यांचे 'स्मार्ट' मीटर ग्राहकांचे कंबरडे मोडत आहेत. हे थांबले नाही तर तीव्र आंदोलन छेडले जाईल. उत्पादीत वीज, वापरलेली वीज आणि एक्सपोर्ट झालेली वीज याचा कुठलाही लेखाजोखा नाही. ही तर ग्राहकांची शुध्द फसवणुक आहे'

- **त्रस्त ग्राहक**, अकोला.

## काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्यासोबत प्रशांत जगताप यांची बैठक

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**मुंबई:** पुणे शहरात कार्यकर्त्यांचं मोठं जाळं असलेल्या प्रशांत जगतापांना आपल्या पक्षात खेचण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांमध्ये चढाओढ लागल्याचं चित्र असून काल रात्रीपासून नाट्यमय घडामोडी घडल्या आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जगताप यांच्याशी फोनद्वारे चर्चा केली असून त्यांना पक्षात येण्यासाठी आवाहन केलं. ठाकरेंच्या कॉलनंतर अवघ्या काही तासांत शिवसेनेचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही प्रशांत जगतापांशी संपर्क साधल्याचे समजते.



पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या हालचाली सुरू झाल्यानंतर प्रशांत जगताप शरद पवारांच्या राष्ट्रवादीतून बाहेर पडले.

## सोमवार, मंगळवार उमेदवारी दाखल करणाऱ्यांची धुम...!

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अकोला:** आज इच्छूकांनी परवानगी काढण्यासाठी महापालिकेच्या एक खिडकीमध्ये गर्दी केली होती. तर शुक्रवार आणि शनिवार आता अर्ज खरेदी आणि अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवार गर्दी करतात का हे पाहण्यासारखे असेल. सोमवार, मंगळवार उमेदवारी दाखल करणाऱ्यांची धुम राहणार आहे.

मंगळवार १७ डिसेंबरपासून महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली. बुधवारी पण मोठ्या संख्येत अर्जांची विक्री महापालिकेने केली. एकाही इच्छुक उमेदवाराने प्रत्यक्षात उमेदवारी अर्ज दाखल न केल्याने पहिला आणि दूसरा दिवस 'निरंक' ठरला. दरम्यान, सर्वच कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी इच्छुक उमेदवारांची मनपा कार्यालयात गर्दी दिसून येत आहे.आज ख्रिसमस निमित्त शासकीय सुट्टी आहे. मंगळवार आणि बुधवार एकूण ९७१ अर्ज विकल्या गेले आहे. जवळपास साडे चारशे उमेदवारांनी अर्ज विकत घेतल्याची माहिती आहे. आज पण, अनेकांनी अर्ज विकत घेतले. सन २०१७ मध्ये झालेल्या निवडणूकीनंतर तब्बल ८ वर्षांनी ही निवडणूक होत आहे. त्यामुळे इच्छूकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. लोकशाहीत जुन्या नगरसेवकांना नागरिक विसरले असून नव्या दमदार उमेदवारांच्या शोधात नागरिक आहे. त्यामुळे यंदा इच्छूकांची संख्या मोठी आहे. अशा परिस्थितीत चार उमेदवारांच्या प्रत्येक प्रभागात प्रत्येकी दहा ते वीस उमेदवार रिंगणात राहणार आहेत. म्हणजे एका प्रभागातून किमान किमान तीस ते पन्नास उमेदवार रिंगणात असतील. जितके जास्त उमेदवार तितकी जास्त डोकेदूखी राजकीय पक्षांना असेल. शुक्रवार आणि शनिवार अर्ज दाखल करणाऱ्यांची संख्या जास्त असेल असे चित्र आहे.

### सावधान, निवडणुकीपुर्वीच पराभव

अर्ज दाखल करताना कुठलिही चुक होऊ देऊ नका. दोन वेगवेगळ्या जाणकारांना आपले अर्ज दाखवा. अर्जातील चुक तुमची उमेदवारी रद्द करु शकते. तुम्ही एखाद्यावर अवलंबून राहत अर्ज दाखल कराल आणि त्याला तुम्हाला निवडणुकीत उभे राहू द्यायचे नसेल तर तो इच्छूकांच्या उमेदवारी अर्जात त्रुट्या ठेवेल आणि तुमची उमेदवारी उभे राहण्यापुर्वीच संपेल. तेव्हा अर्ज भरताना तो वेगवेगळ्या जाणकारांना दाखवून भरुन घ्यावा. खात्री करावी सर्व माहिती अचुक भरली आहे की नाही. अन्यथा, निवडणुकी पुर्वीच तुमचा पराभव होण्याची दाट शक्यता आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५
http://epaper.citynewssuperfast.com



# अटल बिहारी वाजपेयी यांना अभिवादन

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अमरावती** : माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनीही दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# धर्माचरण, सद्विचार आणि परोपकारातच सुख दडलेले – शिवानंद महाराज शास्त्री

**काशिनाथ धाम येथे शिवमहापुराण कथेला भाविकांची मोठी गर्दी**

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**नांदगाव पेठ** : आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या युगात माणूस सुखाच्या शोधात भरकटत चालला आहे. मात्र खरे सुख हे संपत्ती, पद, प्रतिष्ठा किंवा प्रसिद्धीत नसून धर्माचरण, सद्विचार आणि परोपकार यातच दडलेले आहे, असे अत्यंत मोलाचे आणि प्रेरणादायी विचार ह.भ.प. शिवानंद महाराज शास्त्री यांनी व्यक्त केले.परमहंस संत श्री काशिनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित भव्य धार्मिक महोत्सवाला गुरुवारपासून मोठ्या भक्तीभावात प्रारंभ झाला असून, काशिनाथ धाम येथे सुरू असलेल्या शिवमहापुराण कथावाचनात ते बोलत होते.संत काशीनाथ महाराज संस्थान च्या वतीने पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाचे यंदाचे विसावे वर्ष



असून, या निमित्ताने नांदगाव पेठ परिसर संपूर्णपणे भक्तीमय आणि आध्यात्मिक वातावरणाने न्हाऊन निघाला आहे. २५ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या महोत्सवात दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.महोत्सवाच्या प्रारंभी सकाळी संत काशिनाथ महाराज मंदिरात विधीवत पूजा व आरती पार पडली. त्यानंतर संत काशिनाथ बाबा सामूहिक चरित्र ग्रंथ पारायण मोठ्या श्रद्धेने करण्यात आले. पुढे काशिनाथ धाम येथे यजमानांच्या हस्ते विधीपूर्वक पूजन करून पुण्यतिथी महोत्सवाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. दुपारी भाविकांसाठी विशेष आकर्षण असंलेले श्री शिवमहापुराण कथावाचन आयोजित करण्यात आले होते. यावेळी ह.भ.प. शिवानंद महाराज शास्त्री यांनी आपल्या सुमधुर, ओघवत्या आणि प्रभावी वाणीने शिवमहापुराण कथेचे वाचन केले. कथावाचनातून त्यांनी भगवान शंकराचे महत्त्व, भक्तीचे सामर्थ्य आणि मानव जीवनातील नैतिक मूल्यांचे महत्त्व अत्यंत सोप्या शब्दांत विशद केले. यावेळी पुढे बोलताना शिवानंद महाराज शास्त्री म्हणाले, की, भगवंताच्या कथांचे श्रवण केल्याने मन शुद्ध होते, विचार सकारात्मक बनतात आणि जीवनाला योग्य दिशा मिळते. कथा ऐकणे म्हणजे केवळ परंपरा जपणे नव्हे, तर आपल्या जीवनात चांगल्या संस्कारांची रुजवणूक करणे होय.प्रत्येकाने आपल्या जीवनात सत्य, सेवा आणि समर्पण या मूल्यांचा अंगीकार केला, तर समाज नक्कीच सुदृढ, संस्कारक्षम आणि समृद्ध बनेल.संगीतमय कथावाचन, मधुर अभंग, श्लोक आणि नामघोष यामुळे काशिनाथ धाम परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. शिवमहापुराण कथा ऐकण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती, अनेक भक्तांनी या कथावाचनातून आत्मिक शांती व समाधान मिळाल्याची भावना व्यक्त केली. या पुण्यतिथी महोत्सवात श्री ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, हरीभजन, शिवमहापुराण कथा, हरिकीर्तन, सामूहिक प्रार्थना आदी विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असून, सप्ताहभर चालणारा हा महोत्सव भाविकांसाठी एक आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे.संत काशिनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित या भव्य महोत्सवामुळे नांदगाव पेठ परिसरात भक्ती, श्रद्धा आणि संस्कारांची ऊर्जा संचारली असून, भाविकांमध्ये अध्यात्मिक जागृती निर्माण होत आहे.

# सीसीआय कापसाच्या पैशांवर बँकांचा डल्ला ? शेतकऱ्यांच्या तक्रारींनी खळबळ

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**कर्जवसुली थांबवा, नाहीतर 'शिवसेना स्टाईल' उत्तर - युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांचा इशारा**

**दर्यापूर** : सीसीआय (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) मार्फत कापूस विक्री केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणारी रक्कम थकीत कर्जाच्या नावाखाली थेट कर्ज खात्यात वर्ग केली जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. शेतकऱ्यांचे आधार कार्ड ज्या बँकेत लिंक आहे, त्या बँकांकडून परस्पर कर्जवसुली केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी तक्रारींची दखल घेत मा. जिल्हाधिकारी



अमरावती तसेच मा. जिल्हा व्यवस्थापक, अग्रणी बँक अमरावती यांच्याशी थेट चर्चा करून निवेदन सादर केले. कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणारी सीसीआयची रक्कम, शेतकरी अनुदान किंवा इतर कोणतेही शासकीय पैसे बँकांनी परस्पर कर्ज खात्यात वर्ग करू नयेत, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली. यानंतरही जर कोणत्याही बँकेने अशी वसुली केली, तर संबंधित बँक अधिकाऱ्याला 'शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ' असा स्पष्ट इशाराही युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी दिला आहे. दरम्यान, शेतकऱ्यांचे पैसे कर्ज खात्यात वर्ग केल्यानंतर ते परत देण्यास बँक टाळाटाळ करत असल्यास, अशा पीडित शेतकऱ्यांनी थेट संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री. शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातर्फे 44 व्या शूटिंग बॉल अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अमरावती:** शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीउत्सवा निमित्त श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातर्फे ४४व्या विदर्भ राज्यस्तरीय सीनियर महिला व पुरुष शूटिंग बॉल अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावतीच्या क्रीडांगणावर करण्यात आले.

या स्पर्धेचे उद्घाटन श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष . दिलीपबाबु भं. इंगोले यांच्या अध्यक्षतेत . अनिल इंगळे जिल्हा क्रीडा अधिकारी अमरावती यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शकीलोद्दिन काझी चला वर्धा सचिव, अमॅच्युअर शुटींगबॉल



असोसिएन विदर्भ प्रदेश,. प्राचार्य डॉ. अंबादास कुलट स्वीकृत सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, प्रदीप शेट्टीये जिल्हा क्रीडा अधिकारी. वाशिम , डॉ .कुमार बोबडे जनसंपर्क अधिकारी , श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे सचिव आयोजन समिती विचारपिठावर उपस्थित होते. पाहुण्यांचे सन्मानचिन्ह शाल श्रीफळ व फुलझाड देऊन स्वागत करण्यात आले. स्पर्धेच्या आयोजन समितीचे सचिव डॉ. सुभाष गावंडे यांनी प्रास्ताविक केले. या स्पर्धेमध्ये विदर्भातील ११ महिला व ११ पुरुष चम्मू सहभागी झाल्या आहेत. उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन महाविद्यालयाचे प्रा. जितेंद्र राऊत व आभार प्रदर्शन बबनराव आवारे सचिव, अमरावती शूटिंग बॉल असोसिएशन यांनी केले. यावेळी संजय बढे कार्यकारी सदस्य अमॅच्युअर शुटींगबॉल असोशिएन अमरावती तसेच अमॅच्युअर शुटींगबॉल असोशिएन चे सर्व पदाधिकारी व श्री शिवाजी शारीरिक महाविद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# संविधान नाकारले तर मोठी किंमत मोजावी लागेल

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**♦ डॉ.पंजाबराव देशमुख व्याख्यानमालेत डॉ.अविनाश पाटील यांचे व्याख्यान**

**अमरावती** : संविधान हा आपल्या देशातील लोकांनी स्वतःप्रत केलेला करार आहे आणि तो टिकवायचा असेल तर संविधानाकडे निकोपपणे पाहण्याची गरज आहे. संविधान नाकारले तर मोठी किंमत मोजावी लागेल आणि क्षणिक लोभापायी आपण पुढच्या पिढीचे भवितव्य धोक्यात टाकू, तेंव्हा संविधान समजून घ्या, असे आवाहन विवेकनामा फाउंडेशन, धुळेचे अध्यक्ष अविनाश पाटील यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंती उत्सवानिमित्त मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात आयोजित डॉ.पंजाबराव देशमुख व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख हे होते. 'भारतीय संविधान व लोकशाहीपुढील आव्हाने' या विषयावर बोलताना अविनाश



पाटील म्हणाले की, संविधानापलीकडे काही वेगळी यंत्रणा आहे आणि त्या आधारावर कारभार चालतो असे आजचे चित्र आहे.एक अदृश्य शक्ती काम करत आहे जी संविधानाने निर्माण केलेल्या यंत्रणाच्या पलीकडे आहे,पुढे पूर्ण कारभार या शक्तीच्या हातात जाईल की काय अशी भीती निर्माण झाली आहे.संविधानसंबंधीचे काही गैरसमज असून आपण संविधानाकडे निकोपपणे बघतो की नाही असे जाणवते. संविधानाबाबत गैरसमज पसरविल्या गेले आणि आजही जात आहेत, असेही पाटील म्हणाले.

आपल्याला संविधान समजून घेण्याची गरज वाटली नाही कारण आपल्याला जे पाहिजे ते सहज मिळत गेले.आपल्या पिढ्यांनी केवळ संविधानाचे फायदेच घेतले.या देशाचा कारभार राजकीय नेते नव्हे तर प्रशासकीय नेते चालवितात.देशातील सर्वच व्यवस्थांची हास्यास्पद अवस्था असून प्रशासकीय यंत्रणेने त्यांना हात लागणार अशी व्यवस्था करून ठेवली आहे.संविधानाबाबत लोकशाहीत व प्रशासनात काही अंधश्रद्धा तयार केल्या गेल्या आहेत. आणि लाभार्थी समूहाकडून सुद्धा त्या तयार केल्या गेल्या आहेत.अशा वेळी संविधान समजून घेण्याकरिता संविधान सभेतील चर्चा वाचणे आवश्यक आहे, अत्यंत कमी शब्दात मांडलेली संविधानाची उद्धेशिका ही एखाद्या महाकाव्यासारखी आहे.असेही ते म्हणाले. शिक्षित समाजाचा संविधाना संदर्भातला दृष्टीकोन नकारात्मक असणे ही शोकांतिका असून ही उदासीनता कशी दूर करता येईल असा प्रयत्न शिव परिवाराकडून करू, असे व्याख्यानाचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख आपल्या भाषणात म्हणाले. यावेळी अविनाश पाटील यांचा शाल, ग्रंथ, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देउन सत्कार करण्यात आला.व्याख्यानाचे प्रास्ताविक श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंबादास कुलट यांनी केले तर डॉ.राजेश मिरगे पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ.प्रशांत हरमकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे संचालन डॉ.जयराम गायकवाड यांनी केले व डॉ.अपर्णा सरोदे यांनी आभार मानले.

# जिजाऊ बँकेच्या रौप्य महोत्सवी वर्षात विदर्भाचे मानसी उत्पन्न वाढेल – अविनाश कोठाळे

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अमरावती** : जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेचे रोप्य महोत्सवी वर्ष हे उद्योग वर्ष म्हणुन साजरे करण्याचे बँकेने ठरविले असुन आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वच देशांमध्ये आणि भारतामध्ये सुद्धा २०२५हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून युनायटेड नेशनस् ऑर्गनायझेशन या संस्थेचे घोषित केले आहे. भारताची अर्थव्यवस्था जगामध्ये चौथ्या क्रमांकावर असताना भारताचे दरडोई उत्पन्न केवळ २.३४लक्ष असून महाराष्ट्राचे उत्पन्न २.८०लक्ष असताना विदर्भाचे माणसी उत्पन्न केवळ रू.६५३६८/- आहे. त्यामुळे जिजाऊ बँकेने विदर्भातील युवकांना स्वयंरोजगारासाठी विविध उद्योगांसाठी कर्ज देऊन मानसी उत्पन्न वाढवण्याचा उद्योग वर्षात निर्धार केला असल्याचे जिजाऊ बँकेचे अध्यक्ष ईजी.अविनाश कोठाळे यांनी प्रतिपादन केले.

सहकारच सुंदर जग घडविते हा संदेश जगभर आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त देण्यात आला आहे. जिजाऊ बँक आर्थिक वर्ष २०२५- २०२६ हे संपूर्ण वर्ष



उद्योग वर्ष म्हणून साजरे करीत असल्याने जिल्हा उद्योग केंद्राच्या २५४ विविध उद्योगांना ग्रामीण भागात ३५ इआणि शहरी भागात २५ इ सबसिडी असलेल्या २५लक्ष रकमे पर्यंतच्या कर्जांना प्राधान्य देणार आहे. महिलांसाठी पर्यटन विकास मंडळाच्या आई योजना अंतर्गत १५ लक्ष पर्यंतचे कर्ज ७वर्ष व्याज परतावा सरकार भरणार या सुविधेसह ३१ उद्योगांना देण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या पंतप्रधान खाद्यपदार्थ प्रक्रियांच्या ४५ विविध उद्योगाकरिता १५लक्ष पर्यंत ३५ टक्के सबसिडीचे कर्ज जिजाऊ बँक उपलब्ध करून देणार आहे. अंजनगाव सुर्जी येथे जिजाऊ बँकेचे अध्यक्ष ईजी. अविनाश कोठाळे यांनी सदर उदबोधनात जिजाऊ बँक ग्रामअर्थ समितीचे महत्व अंजनगाव सुर्जी येथील जिजाऊ बँकेच्या सभेत विषद केले. या कार्यक्रमासाठी बँकेच्या व्यवस्थापन मंडळाचे तज्ञ संचालक भैय्यासाहेब निचळ यांनी उद्योगाचे महत्व तथा बँकेची ४७० कोटी ठेवी, ३२५ कोटी कर्ज ,'ए'ग्रेड जिजाऊ बँक, युवकांची काळजी घेणारी आणि ग्रामीण भागात आर्थिक मदत करणारी जिजाऊ बँक असल्याचे सांगितले. बँकेच्या अंजनगाव सुर्जी येथील सदस्य प्राध्यापक हेमंत येवले यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. कार्यक्रमाला अमोल पोटे, साहेबराव ठाकरे ,जयेंद्र गाडगे, गणेश साबळे, संतोष हरणे ,उद्धव पोटे, संतोष येरळ, संतोष जाधव, सुभाष रडके, विजय पोटे ,रुपराव शिंगणे, रघुनाथ मळसणे, अशोक काकड, राजेश तळोकार, अतुल येवले , सचिन वाघमारे ,सुनील येवले, प्रदीप पोहनकर, उद्योजक चरण बाराब्दे आणि असंख्य नागरिक उपस्थित होते. आभार प्रदर्शन अमोल पोटे यांनी केले. याप्रसंगी दोन हजार पेक्षा लोकसंख्या जास्त असलेल्या गावांमध्ये युवकांना प्रोत्साहित करण्यासाठी व ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी जिजाऊ बँकेने जिजाऊ ग्राम अर्थ समिती स्थापनेच्या निर्णयाचे सर्वांनी अभिनंदन व स्वागत केले.

# विदर्भात आंबा लागवडीसाठी चांगले कृषी हवामान

**कुलगुरुद्वय डॉ.शरद गडाख आणि डॉ.विलास खर्चे यांचे आंबा लागवडीचे आवाहन 'शिवाजी'च्या आंबा परिषदेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**



प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अमरावती** : विदर्भात आंब्याचे क्षेत्र वाढायला भरपूर वाव असून केशर आंब्याला देशविदेशात मोठी मागणी आहे.एकात्मिक शेती पद्धतीत आंबा फार मोठे उत्पादन देऊ शकतो. विदर्भात आंबा लागवडीसाठी चांगले कृषी हवामान आहे त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांनी आंब्याची लागवड मोठ्या प्रमाणात करावी, असे आवाहन डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांनी केले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित आंबा परिषदेच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे हे होते.महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे सदस्य मोरेश्वर वानखडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजानन पुंडकर, ॲड.जे.व्ही.पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, सुरेशदादा खोटरे, प्रा.सुभाष बनसोड, संस्था सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, प्राचार्य डॉ.अमोल महल्ले, विजय ठोकळ उदघाटन सोहळ्याला प्रामुख्याने उपस्थित होते.

**कुलगुरू डॉ.विलास खर्चे**

आपला देश कृषिप्रधान देश असून महाराष्ट्र हे कृषीच्या संदर्भात अग्रगण्य राज्य आहे आपल्या राज्याची हार्टीकल्चर राज्य म्हणून ओळख आहे, असे प्रमुख अतिथी कुलगुरू डॉ.विलास खर्चे म्हणाले.एकचएक पिक पद्धतीमुळे जमिनीचे आरोग्य खालावले असून हवामान बदलाचा देखील शेतीवर परिणाम होत आहे.

**अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख**

आज कृषिप्रधान देश आहे असे म्हणूनच आपण समाधान मानायचे का?असा सवाल करत कार्यक्रमाचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी शेतीचे उत्पादन ६० टक्क्यावरून चार टक्क्यावर आल्याचे सांगितले.कृषीचे उत्पन्न वाढल्या शिवाय भारताचा जी.डी.पी वाढणार नाही, असेही ते म्हणाले.संस्था भाऊसाहेबांच्या शेतीच्या संदर्भातील विचारांना बांधील असून त्या दृष्टीने कार्य करीत आहे. आमच्या कृषी महाविद्यालयांनी कृषी क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग सुरु केले आहेत.पुढच्या वर्षी पुन्हा भव्य कृषी प्रदर्शनी घेण्याचा संस्थेचा मानस आहे,असेही त्यांनी सांगितले.

## सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# खामगावात 22 लाख 46 हजारांचा प्रतिबंधित गुटखा पकडला !

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**♦ ट्रकसह ३३ लाखांचा मुद्देमाल जप्त**

**खामगाव** : महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या ट्रकला पकडून उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकानी २२ लाख ४६ हजारांच्या गुटख्यासह ३३ लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याची घटना खामगाव – अकोला मार्गावरील टेंभुर्णा फाट्याजवळ २५ डिसेंबरच्या रात्री उघडकीस आली.

येथील उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या पथकाला माहिती मिळाली की, नांदुरा-अकोला मार्गावरून गुटख्याची अवैधरित्या वाहतूक



केली जात आहे. या गुप्त माहितीवरून पथकाने २५ डिसेंबर रोजी सायंकाळी नांदुरा-अकोला महामार्गावरील टेंभुर्णा फाट्याजवळ नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली असता एक पांढऱ्या रंगाची डीसीएम ट्रक क्रमांक एमपी ०९ जीएच ८१६५ ची तपासणी करून पाहणी केली असता त्यामध्ये अवैध गुटखा मोठ्या प्रमाणात आढळून आला. सदर ट्रकमध्ये अवैध गुटख्याचे ५० पोते एकूण रक्कम २२ लाख ४६ हजार ४०० रुपये तसेच ट्रक किंमत दहा लाख असा एकूण ३३ लाख ४६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी ट्रकचालक ब्रिजगोपाल गुलजारसिंग यदुवंशी (४५) रा. इंदोर याला ताब्यात घेतले असून त्याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ड्रिंक अँड ड्राइव्ह महागात पडणार, खामगाव पोलिसांचा इशारा

सुरज बोराखडे २६ डिसेंबर

**खामगांव** : वर्षाला निरोप देत नवीन वर्षीचे स्वागत करत सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पण वर्ष च्या शेवटच्या दिवशी दारू पिऊन गाडी चालवणे दारुड्यांना महागात पडणार आहे. नववर्षीनिमित्त शहर पोलिसा च्या वतीने मोहीम राबविण्यात येणार असून मद्यधुंद वाहनचालकांना आळा घालण्यासाठी ब्रेथ नालायझरचा वापर करण्यात येणार आहे. दरवर्षी नवीन वर्षीच्या स्वागतासाठी सर्वजण जल्लोषाचे वातावरण तयार करतात, काही जण नवीन वर्षाची चांगली सुरुवात करण्यासाठी पॅनिंग करतात, तर दुसरीकडे थर्टी फर्स्टच्या दिवशी उत्साही तरुणाई मद्यपान आणि पार्टी करण्याचे बेत आखतात. नवीन वर्षाच्या धुक्यात मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवल्या मुळे लहान-मोठे अपघात होऊ नयेत, त्याचप्रमाणे रस्त्यावर कोणत्याही प्रकारचा वाद होऊ नये, यासाठी शहर पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात एनार आहे. दारू पिऊन गोंधळ घालणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे, नशेत वाहन चालवणे महागात पडणार आहे, विशेषतः मद्यधुंद वाहनचालकांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून ब्रेथ नालायझरचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे भरधाव वेगात वाहने चालविणाऱ्या व कायद्याचे उलंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मोहीम पोलिसांकडून राबविण्यात एनार असून शहरातील चौकाचौकात नांदुरा रोड, जलंब नाका, टॉवर चौक, शेगाव नप टर्निंगसह मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करण्यात येत आहे. कारवाईसाठी पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. सर्व वाहनधारक आणि बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर असेल. नियम पाळा – पवार ठाणेदार शहर पोलीस स्टेशन नवीन वर्षाची सुरुवात चांगली होण्यासाठी नागरिकांनी नियमांचे पालन करावे. चौकाचौकात पोलीस बंदोबस्त असेल, कोणी दारू पिऊन गाडी चालवताना दिसल्यास संबंधित व्यक्तीवर कडक कारवाई केली जाईल. तरुणांनी पोलिसांना सहकार्य करावे.

सिटी न्यूज अकोला

शुकवार, दि. २६ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

## बी.सी.ए. परीक्षेत खंडेलवाल महाविद्यालयाच्या शितल साखरेचे उज्वल यश

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अकोला :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने जाहीर केलेल्या बी.सी.ए. गुणवत्तायादीत शितल किशोर साखरे हिने सातवा क्रमांक पटकावला. शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा डॉ. ताराताई हातवळणे, सचिव गोपाल खंडेलवाल, कोषाध्यक्ष नानासाहेब कुलकर्णी यांचे मार्गदर्शन तसेच प्राचार्य डॉ. जगदीशजी साबू यांचे नेतृत्वाचा तिच्या यशात वाटा आहे. संगणक शास्त्र विभाग प्रमुख



डॉ. दीप्ती पेठकर, डॉ. नितीन सुरडकर, प्रा. अंजली मलिये, प्रा. स्मिता धनोकार, प्रा. पूजा शर्मा, प्रा. सिद्धी वाघारे, प्रा. तिजारे, डॉ. कवर आदी प्राध्यापकांच्या परिश्रमांचे हे फलित आहे.

## कपिलवस्तू नगराच्या भव्य रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, आठवले अकोला जिल्ह्याच्या वतीने स्थानीय कपिलवस्तू नगरच्या बुद्ध विहार परिसरात आयोजित भव्य रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा उपक्रम रिपाइं जिल्हाध्यक्ष सुनील अवचार, जिल्हा महासचिव आशिष शिरसाट, जिल्हा युवक आघाडी जिल्हाध्यक्ष बुद्धभूषण गोपनारायण, तेल्हारा तालुका अध्यक्ष गणेश थोरात, अकोट तालुका अध्यक्ष दयानंद तेलगोटे, अकोट तालुका महासंचिव दिनेश पेटकर यांनी साकार केला. यावेळी रामदास आठवले यांचा हा वाढदिवस संघर्ष नायक म्हणून साजरा करण्यात आला.

## लेखिकांसाठी प्रेरणादायी संमेलन : प्रा. डॉ. भारती सुदामे

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अकोला :** उत्तम नियोजन, नाविन्यपूर्ण साहित्य कार्यक्रम आणि उत्साहाने भरलेलं लेखिका संमेलन प्रेरणादायी असल्याचे ज्येष्ठ लेखिका व संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. भारती सुदामे म्हणाल्या. विदर्भ साहित्य संघ, अकोला शाखेच्या वतीने आयोजित एक दिवसीय लेखिका संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलत होत्या.

व्यासपीठावर संमेलनाच्या उद्घाटिका अभिनेत्री डॉ. श्वेता पेंडसे, शिक्षण उपसंचालक डॉ. सुचिता पाटेकर, स्वागताध्यक्ष नीलिमा विलास पाटील, विदर्भ साहित्य संघ, नागपूरचे अध्यक्ष प्रदीप दाते, सरचिटणीस विलास मानेकर, सदस्य नितीन सहस्त्रबुद्धे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य डॉ. दादा गोरे व अकोला शाखा अध्यक्ष विजय कौसल, डॉ. सहदेव रोठे, लेखिका संमेलनाचे मुख्य कार्यवाह डॉ. गजानन नारे उपस्थित होते.



प्रभात परिवाराचे संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबराव नारे स्मृती साहित्य मंचावर होणारे लेखिका संमेलन त्यांच्या संकल्पनेतील असल्याची पालती डॉ. दादा गोरे यांनी दिली. प्रदीप दाते, डॉ. सुचिता पाटेकर यांची भाषणे झाली.

दुपारच्या सत्रात अभिनेत्री डॉ. श्वेता पेंडसे यांची मोहिनी मोडक व डॉ. समृद्धी तिडके यांनी प्रकट मुलाखत घेतली. संमेलनात प्रकाशक, महिला पत्रकार आणि ज्येष्ठ लेखिकांचा सन्मान करण्यात आला. प्रतिभा जानोळकर, प्रभा नितीन खंडेलवाल प्रमुख अतिथी होत्या. समारोप समारंभात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीकांत तिडके यांच्या हस्ते ज्येष्ठ लेखिका पद्मा मांडवगणे, मीरा ठाकरे, शीला गहलोत, देवका देशमुख, डॉ. विमल भालेराव, डॉ. लीना आगाशे, वीणा मालशे, प्रेमा शुक्ल, प्रा. डॉ. अनघा सोनखासकर यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गजानन नारे, संचालन मंजुश्री कुळकर्णी यांनी तर आभार प्रदर्शन चंद्रकांत पोरे यांनी केले.

स्व. सीमाताई शेटे-रोठे स्मृती समर्पित एक दिवसीय लेखिका संमेलनाचा प्रारंभ ग्रंथदिंडीने झाला. स्व. प्रा. भाऊसाहेब मांडवगणे साहित्य नगरीत ग्रंथदिंडीचा प्रारंभ होण्यापूर्वी ग्रंथदिंडी पूजन प्रा. डॉ. ममता इंगोले, अभिनेत्री डॉ. श्वेता पेंडसे यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथदिंडीत गीतांजली विद्यालय, कान्हेरी सरप, तुळसाबाई कावल विद्यालय, पातूर, डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय, पातूर, किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूल, पातूर, जिजाऊ कन्या विद्यालय, अकोला, जिजामाता विद्यालय, नया अंदुरा, जि.प. वरिष्ठ प्राथमिक शाळा, कामरगाव आणि प्रभात किड्स स्कूलच्या विद्यार्थीनींचा ग्रंथदिंडीत सहभाग होता.

## महानगरात अग्रवाल समाजच्या सामूहिक विवाह सोहळ्याची तयारी जोरात

**अकोला:** अकोला अग्रवाल समाज वेलफेअर ग्रुप, भाया ग्रुप तसेच अ.भा.अग्रवाल महासभेच्या संयुक्त विद्यमाने महानगरात अग्रवाल समाजातील गरजू तरुण-तरुणींचा मोफत सामूहिक विवाह सोहळा आयोजित केला जात असून, त्याची जोरदार तयारी सुरू आहे. अक्षय तृतीया दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी गायगाव रोड येथील अग्रवाल फार्म हाऊसमध्ये होणाऱ्या या मोफत सामूहिक विवाह सोहळ्याच्या नियोजन बैठकीला स्थानिक अलसी प्लॉट येथील अग्रवाल समाज वेलफेअर ग्रुपच्या कार्यालयात नुकतीच उत्साहात पार पडली.

## रुग्णांना संपूर्णपणे बरे करणे होमिओपॅथीचे अंतिम ध्येय - डॉ.संदीप चव्हाण



प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अकोला :** रविवारी रोजी पार पडलेल्या होमिओपॅथीक कार्यशाळेत होमिओपॅथीक तज्ञ डॉ.संदीप चव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, होमिओपॅथीने रुग्णांना संपूर्णपणे बरे करूनच आपणास रुग्णांचा विश्वास संपादन करता येईल, त्याकरिता सकारात्मक रिझल्ट देने व होमिओपॅथीक क्षेत्रात होणाऱ्या नवं नवीन संशोधनांना आत्मसात करने हे गरजेच. यावेळी येथे ॲडव्हीन बायोटेक कंपनी द्वारा होमिओपॅथीक नवनवीन औषधी बद्दल देखील औगत करण्यात आले. यावेळी नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ होमिओपॅथीचे सदस्य डॉ.किशोर मालोकार हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते तर अतिथी म्हणून राजा होमिओपॅथीक फार्मसी चे संचालक अजय राजा तर कार्यशाळेकरिता शहरातील इतर तज्ञ होमिओपॅथीक मंडळी व होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी उपस्थित होते.

## जगाला शांती, प्रेम आणि आनंद देण्यासाठी देवाने येशू यांना पाठविले : रेव्हरंड निलेश अघमकर

### अकोल्यात खिसमस हर्षोल्हासात साजरा

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अकोला:** प्रभू येशू ख्रिस्तांनी दिलेली प्रेम, बंधुभाव आणि त्यागाची शिकवण आचरणात आणा आणि समाजात वावरताना सत्य आणि खरेपणाचा अवलंब करा, जगाला तारण, शांती, प्रेम आणि आनंद देण्यासाठी देवाने प्रभू येशू यांना भूतलावर पाठवले, असे प्रतिपादन रेव्हरंड निलेश अघमकर यांनी सोमवारी येथे केले. प्रभू येशू ख्रिस्तांच्या जन्मदिवसानिमित्त खदान खिश्चन कॉलनी येथील बेथेल सेव्हिअर्स अलायन्स चर्च येथे आयोजित प्रार्थना सभेमध्ये ते बोलत होते.

२५ डिसेंबर रोजी खिसमस अर्थात नाताळ हा सण जगभरात साजरा केला जातो. अकोला शहर आणि जिल्ह्यातही सोमवारी येशू खिस्तांचा जन्मदिवस अर्थात नाताळ हा सण मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. यावेळी खिश्चन बंधू - भगिनींनी एकमेकांना विविध भेटवस्तू, शुभेच्छापत्रे देऊन परस्परांचे अभिनंदन केले. खिसमसनिमित्त १६० वर्षांचा इतिहास असणारी अकोल्यातील एकमेव खिश्चन कॉलनी घरांना करण्यात आलेल्या रंगरंगोटी आणि रोषणाईने झगमगून आणि उजळून निघाली आहे. शहरात खिश्चन धर्मियांच्या धार्मिकस्थळांची म्हणजेच चर्चचीदेखील सजावट आणि रोषणाई करण्यात आली आहे. विविध ठिकाणी खिसमस ट्री आणून त्यांच्यावर रोषणाई करण्यात आली आहे. अनेक चर्चेसमध्ये येशूच्या जन्माचे देखावे सादर



करण्यात आले आहेत.

२४ डिसेंबरच्या रात्री खिश्चन अबालवृद्धांनी विविध चर्चेसद्वारे आयोजित कॅरल पार्टीमध्ये सहभागी होऊन रात्रभर घरोघरी भेटी देऊन खिस्तजन्माची गीते गायिली आणि एकमेकांना खिस्तजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. सांताक्लॉजच्या वेषातील युवक - युवती यावेळी सर्वांच्याच आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. गुरुवार, २५ डिसेंबर रोजी सकाळी सर्वच चर्चेसमधून प्रार्थनासभांचे आयोजन करण्यात आले होते. खिश्चन कॉलनी येथील बेथेल सेव्हिअर्स अलायन्स चर्चमध्ये रेव्हरंड निलेश अघमकर यांनी खिसमसचा संदेश दिला. इतरही चर्चेसमधून धर्मगुरुंनी खिस्तजन्मावर आधारित संदेश दिले. चर्चेसमध्ये यावेळी संडेस्कुल, महिला संघ, तरुण संघ यांनी खिस्तजन्मावर आधारित गीते सादर केली. पुढे आठ दिवस खिस्तजयंतीचा आनंदोत्सव साजरा करण्यात येईल.

## थॅलेसिमियाग्रस्त बालकांसाठी सात वर्षांची सेवायात्रा; संकलित निधी समर्पित



प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अकोला:** भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प यांच्या वतीने सात वर्षांपासून थॅलेसिमियाग्रस्त बालकांच्या उपचारासाठी रद्दी संकलन उपक्रमातून निधी संकलित करण्यात येतो.

यंदा संकलित करण्यात आलेला निधी पाच थॅलेसिमियाग्रस्त बालकांच्या संपूर्ण वर्षभराच्या वैद्यकीय उपचार व रक्तसंक्रमणासाठी डॉ. हेडगेवार रक्तपेढीस समर्पित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अजय देशपांडे, प्रमुख पाहुणे भास्करराव कीटुकले, डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे निलेश जोशी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन दिलीपराव देशपांडे यांनी केले. प्रारंभी मान्यवरांचे स्वागत निलेश देव व डॉ. स्नेहा गोखले, सौ.रश्मी देव यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी थॅलेसिमिया या आजाराबाबत माहिती देताना सांगितले की, या आजाराने ग्रस्त मुलांना दर पंधरा ते वीस दिवसांनी रक्तसंक्रमणाची आवश्यकता असते. ॲड. धनश्री देव स्मृती सेवा या सातत्यपूर्ण उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. जयंतराव सरदेशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले.

## निधन वार्ता

### भास्कर नागोलकार



**पातुर:** राहेर येथील भास्कर रामकृष्ण नागोलकार (५७) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली असा असा मोठा परिवार आहे. पत्रकार योगेश नागोलकार यांचे ते वडील होत.

## कुटासा शिवारात वन्यप्राण्यांचा हैदोस वाढला; पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

विशेष प्रतिनिधी २६ डिसेंबर

**कुटासा:** परीसरातील शेतशिवारात सध्या वन्यप्राण्यांचा हैदोस वाढल्याने शेतकरीवर्ग अडचणीत सापडला आहे.रोई, रानडुक्कर, हरणे, माकडे, या वन्य प्राण्यामुळे कपाशी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून, मेहनतीचा घास क्षणात मातीमोल होत आहे. विशेषतः तूर, कपाशी, हरभरा, या पिकांना सर्वाधिक फटका बसत आहे.

रात्रीच्या वेळी कळपाने येणारी रोई रानडुकरे उभ्या पिकांची नासधूस करतात. माकडांच्या टोळ्या दिवसा शेतात शिरून बोंड्या तोडून टाकतात, तर हरणे पिकेचरत असल्याने उत्पादनात मोठी घट होत आहे. अनेक शेतकरी रात्रात्र शेतात पहारा देत आहेत. मात्र, वन्यप्राण्यांच्या संख्येत झालेली वाढ आणि अपुरी संरक्षण व्यवस्था यामुळे हे प्रयत्न अपुरे ठरत आहेत.काही ठिकाणी नुकसानभरपाईसाठी अर्ज करूनही प्रक्रिया संथ असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे.पिकांच्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. बियाणे, खत, औषधे व मजुरीचा खर्च वसूल होणे कठीण झाले असून शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. दरम्यान, वनविभागाने पिंजरे लावणे, गस्ती वाढवणे व सौर कुंपण उभारणीस प्रोत्साहन देणे अशा उपाययोजना जाहीर केल्या आहेत. मात्र, शेतकऱ्यांच्या मते या उपायांची अंमलबजावणी अपुरी आहे. वन्यप्राणी आणि मानवी वस्तीतील संघर्ष कमी करण्यासाठी तातडीने प्रभावी उपाय, वेळेत नुकसानभरपाई आणि दीर्घकालीन व्यवस्थापन आराखडा राबविण्याची जोरदार मागणी होत आहे.

माझ्या शेतातील कपाशी पिकाचे वन्य प्राणी रोज नुकसान करत असुन रोईचे कळप चे कळप माझ्या शेतातील कपाशीचे पिक मोडत असल्याने माझे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे वन विभागाने शेताची पाहणी करुन नुकसानीचा पंचनामा करावा.
**किरण नवलकार,**
शेतकरी कुटासा



## मॅफेड्रॉन प्रकरणातील फरार आरोपीला भोपाळमध्ये अटक

### आरोपीस २८ पर्यंत पोलिस कोठडी

प्रतिनिधी २६ डिसेंबर



**अकोला :** बार्शीटाकळी तालुक्यातील बंद पडलेल्या किसान जिनिंगमध्ये अंमली पदार्थ निर्मिती होत असल्याचा प्रकार एक वर्षापूर्वी उघडकीस आला होता. या प्रकरणातील फरार आरोपीला २४ डिसेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेने भोपाळ येथून अटक केली.

२३ ऑक्टोबर २०२४ रोजी ब्रार्शीटाकळी येथील बंद अवस्थेतील केसान जिनिंगमध्ये काही इसम नॅफेड्रॉनसारखा अंमली पदार्थ तयार करीत असल्याची माहिती व्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या आधारे पथकाने घटनास्थळी छापा टाकत पाच आरोपींना अटक केली होती. यांच्याकडून ५.५४८ किलो मॅफेड्रॉन एस, तसेच ड्रग्स निर्मितीसाठी लागणारे केमिकल व साहित्य जप्त केले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शंकर शेळके यांनी पाच आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करून तपास पुरू केला होता. दरम्यान अटकेतील आरोपी जतिन जगमोहन दोषी (रा. भांडुप, मुंबई) याच्यासोबत संगनमत करून फरार आरोपी मोहम्मद अशरफ मोहम्मद आझम राइन (२६, रा. मुंबई) याने मॅफेड्रॉन तयार करण्यासाठी लागणारे केमिकल ड्रग्स कारखान्यास पुरविल्याचे निष्पन्न झाले.

या आधारे स्थानिक गुन्हे शाखेने २४ डिसेंबर रोजी भोपाळ येथून फरार आरोपीला ताब्यात घेऊन अटक केली. आरोपी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, बार्शीटाकळी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला रविवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

## जिल्ह्यात सोयाबीन व तुर पिकाच्या उत्पादनात प्रचंड घट

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**आलेगाव :** जिल्हाभरात सोयाबीनच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली. मात्र तुरीच्या पिकाकडून शेतकऱ्यांना थोडीफार आशा होती मात्र अगोदरच अतिवृष्टी मुळे बऱ्याच ठिकाणचे तुरीचे पीक जळून गेले. मात्र जे काही राहले त्या पिकावर सध्याच्या विषम हवामानामुळे व रोगराई मुळे तुरीचे पीक सुद्धा शेतकऱ्यांच्या हातचे गेले आहे.

मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात अति थंडी, हवा, धुके तर दिवसा ऊन असल्याने जवळपास ९० टक्के शेतातील शेंगा भरल्या नाहीत, तसेच यावर्षी मोठ्या प्रमाणात मूळकूज रोगाचा तुरीवर प्रादुर्भाव झाल्याने बहुतांश शेतातील तुरीचे उभे पिकं वाळून गेली आहेत, यामुळे उत्पादनात मोठी घट झाली असून शासनाने त्वरित खरीप सोयाबीन, तूर पिकाचा विमा शेतकऱ्यांना द्यावा जणेकरून शेतकरी उन्हाळी पिकाची व्यवस्था करू शकतील तसेच अतिवृष्टीमुळे, नदी नाले मर्यादा ओलांडून वाहल्यामुळे सदरच्या पुरामध्ये



यावर्षी माझे शेतातील तूर वातावरणामुळे पूर्णपणे वाळून गेली असून, उत्पादन काहीच झाले नाही, शेतीचा खर्च सुद्धा निघाला नसल्याने शासनाने त्वरित खरीप चा पीक विमा द्यावा व मदत करावी
**गोपाल ताले,**
शेतकरी, सायवणी ता पातूर

शेकडो शेतकऱ्यांची उभी पिके वाहून गेली.त्यांना दुबार आणि बोगस बियाण्यामुळे तिबार पेरणी करावी लागली.यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडल्यामुळे, अनेक शेतकऱ्यांनी पीक विमा पॉलिसी काढली नाही. अशा शेतकऱ्यांना विमा पॉलिसीचा लाभ सरकार कडून देण्यात यावा अशी मागणी होत आहे.

या वर्षी झालेल्या अतिवृष्टी मुळे व सध्याच्या विषम हवामानामुळे सोयाबीन व तुरीच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झालेली दिसून येत असून शासनाने त्वरित खरीप चा सोयाबीन व तुरीचा पीक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश पीक विमा कंपनी ला द्यावेत जणेकरून शेतकरी उन्हाळी पिकांची पेरणी करु शकतील.
**विनोद शालिग्रामजी राऊत,**
मळसुर ता पातूर

## युवतीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीचा जमीन फेटाळला

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अकोट :** युवतीच्या आई-वडिलांना मारण्याची धमकी देवून बनावट प्रमाणपत्राच्या आधारे लग्न झाल्याचे भासवून युवतीवर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी पवन नागले याचा जामीन अर्ज अकोट सत्र न्यायालयाने फेटाळून लावला. जिल्हा व सत्र न्यायाधिश बी. एम. पाटील यांनी अकोट शहर पोलिस स्टेशनमध्ये दाखल गुन्ह्यातील आरोपी पवन दिलीप नागले (३३) रा. शिवाजीनगर एलीचपूर वेस अकोट या आरोपीने युवतीच्या कुटुंबाला संपविण्याची भीती दाखवून, युवतीवर लैंगिक अत्याचार केल्याच्या प्रकरणात दाखल केलेला जमानत अर्ज फेटाळला आहे. १९ डिसेंबर रोजी पोलिसांनी या आरोपीला अटक केल्यापासून आरोपी अकोला कारागृहात आहे. सरकारी वकील अजित देशमुख यांनी जमानत अर्जावर लेखी उत्तर व युक्तीवाद सादर केला. पिडीतीने १५ डिसेंबर रोजी अकोट शहर पोलिस स्टेशनला फिर्याद दिली. आरोपीला जमानत दिल्यास तो फरार होण्यास नाकारता येत नाही. या प्रकरणात अमरावतीचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी पोलिस अधीक्षक अकोला यांना योग्य ती कारवाई करून अहवाल पाठविण्यात यावा, असे पत्र दिले होते. तसेच खा. बोंडे यांनी अमरावती जिल्हाधिकाऱ्यांना चंद्रविला विवाह संस्था विजय कॉलनी अमरावती या संस्थेवर कारवाई करण्यात यावी आणि युवतीचे बनावट लग्न प्रमाणपत्राचा आधार उद्ध्वस्त होणारे आयुष्य वाचवावे, असे पत्र दिले. या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक अविनाश मोहिते करीत आहेत. महिला अत्याचारासंबंधी गंभीर असून खटला जलदगतीने चालविण्यास तयार आहे. त्याकरीता आरोपीला कारागृहातच ठेवण्यात यावे, असा युक्तीवाद सरकारी वकील अजित देशमुख यांनी न्यायालयात केला. सरकार पक्षाला ॲड. ऋचा ठाकूर, ॲड. एस. ए. वसु यांनी सहकार्य केले. दोन्ही पक्षांच्या युक्तीवादानंतर न्यायालयाने आरोपीचा जमानत अर्ज नामंजूर केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५

# शिवसेने 'उबाठा'चा खासदार असतांना 'मशाल' का पेटली नाही?

## पराभूत उमेदवारांची पत्रकार परिषद; पक्षनेत्यांवर नार्को टेस्टसह गंभीर आरोप

प्रतिनिधी २६ डिसेंबर



**यवतमाळ** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या नगर परिषद निवडणुकीतील पराभूत उमेदवारांनी यवतमाळ येथील विश्रामगृहात पत्रकार परिषद घेऊन पक्षातील वरिष्ठ नेत्यांवर थेट गंभीर आरोप केले. उमेदवारांनी पक्ष नेतृत्वाकडून सहकार्य न मिळाल्याची तीव्र नाराजी व्यक्त करत, 'मशाल' चिन्ह विझवण्यात कोणाची भूमिका आहे, खासदारांच्या जिल्ह्यात मशाल का पेटली नाही असा सवाल उपस्थित केला.

या पत्रकार परिषदेत पराभूत उमेदवारांनी पक्षाचे सर्व पदाधिकारी, खासदार संजय देशमुख, जिल्हा प्रमुख किशोर इंगळे, जिल्हा संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड, नेते संतोष ढवळे यांची नार्को टेस्ट करण्याची मागणी केली. तसेच, महाविकास आघाडी अचानक का तुटली आणि यामागील निर्णय कोणाच्या नेतृत्वात झाले, यावर स्पष्टीकरण देण्याची मागणी त्यांनी केली. कार्यकर्त्यांवर भेदभाव, पक्षाचे निधी व्यवस्थापन, आणि खासदारांच्या जिल्ह्यात मशाल का पेटली नाही, यासंदर्भातही उमेदवारांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले. पराभूत उमेदवारांचे म्हणणे होते की, निवडणुकीत पक्षाकडून कोणताही आर्थिक आधार मिळाला नाही, ज्यामुळे पक्षाचे बऱ्याच वरिष्ठ नेते नगरसेवक पदाच्या उमेदवारांना योग्य पद्धतीने प्रोत्साहन देऊ शकले नाहीत. पत्रकार परिषदेत अतुल गुल्हाने (शहर प्रमुख), मनीष लोळगे, शुभम तोलवानी, मंदाताई भिवंगडे, रवी राऊत, बाळू नाईक आणि श्रद्धा लोळगे उपस्थित होते. उमेदवारांनी सांगितले की, लवकरच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि वरिष्ठ नेत्यांना भेटून ही सर्व बाजू मांडणार आहेत. पराभूत उमेदवारांच्या म्हणण्यानुसार, पक्षाच्या वरिष्ठ कार्यकर्त्यांकडून मिळालेल्या वागणुकीमुळे नगरसेवक पदाच्या उमेदवारांचे पाच वर्षांचे नुकसान झाले आहे.

# पालिका निवडणुकीत शून्य यश; शिवसेना युतीतील विसंवाद ठरला निर्णायक

प्रतिनिधी २६ डिसेंबर



**यवतमाळ** : यवतमाळ नगर परिषद निवडणुकीत ५८ पैकी एकाही जागेवर यश न मिळणे हा निकाल राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. निवडणूकपूर्व युतीविषयक निर्णयप्रक्रियेत झालेला विसंवाद आणि समन्वयाचा अभाव याचा थेट परिणाम निकालावर झाल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

निवडणुकीदरम्यान पक्षांतर्गत मतभेद टाळण्यासाठी यवतमाळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांच्या पुढाकाराने शिवसेनेची युतीसंदर्भातील समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीत जिल्हा संपर्क प्रमुख, जिल्हाप्रमुख तसेच विधानसभा प्रमुख संतोष ढवळे यांचा समावेश होता. काँग्रेससोबत झालेल्या बैठकीनंतर युती करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगण्यात आले होते.

या निर्णयानंतर आयोजित पत्रकार परिषदेत आमदार बाळासाहेब मांगुळकर, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत गाडे पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख किशोर इंगळे, विधानसभा प्रमुख संतोष ढवळे, काँग्रेस शहराध्यक्ष बबलू देशमुख यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. मात्र युतीनंतर जागावाटपाबाबत चर्चा सुरू असतानाच, कोणतीही अधिकृत माहिती न देता युती तुटल्याची बाब पक्षातील पदाधिकाऱ्यांना बाहेरून समजल्याचे सांगण्यात येत आहे.

युती करणे व तोडणे या दोन्ही बाबतीत संबंधित पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. याचा परिणाम निवडणूक प्रचारावर झाला आणि अखेरीस नगर परिषद निवडणुकीत एकही उमेदवार निवडून न येण्याची वेळ आली.

या निकालामुळे स्थानिक पातळीवरील राजकीय नियोजन, संवाद आणि निर्णयप्रक्रियेवर प्रश्न उपस्थित झाले असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षांना आत्मपरीक्षण करावे लागणार असल्याचे शिवसेना उबाठाचे नेते संतोष ढवळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# घरफोडी करणारे दोन आरोपी ताब्यात, ८ चोरी उघडकीस

प्रतिनिधी २६ डिसेंबर




**यवतमाळ** : वाढत्या घरफोडीच्या घटनांवर लक्ष ठेवून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई करत दोन अटळ घरफोडी करणारे इसम ताब्यात घेतले. वणी परिसरात पेट्रोलिंग करत असताना पोलीसांना लालगुडा परिसरात संशयित फिरताना दिसले. त्यांना ताब्यात घेतल्यावर सुरुवातीला अस्पष्ट उत्तरे दिली, परंतु विचारपूस करत आरोपींनी आपली कबुली दिली आणि ८ घरफोडी उघडकीस आल्या.

सचिन सतोष नगराळे, रा. बोरगाव अहेरी, ता. वणी ह.मु. न्यू सोमठाणा, भद्रावती व कार्तीक शंकर साळवे, रा. घुटकाळा, नेहरू शाळा मागे, चंद्रपुर अशी आरोपींची नावे आहे. तपासात सात चोरीचे गुन्हे वणी पोलिस स्टेशन अंतर्गत व एक गुन्हा भद्रावती पोलिस स्टेशन अंतर्गत उघडकीस आले. त्यांच्याकडून जप्त केलेले मुददेमाल टीव्ही, होम थिएटर, माईक, चादीचे साहित्य व नगदी – एकूण २,०३,५८०/- रुपयांचा आहे. सचिन नगराळे हा अत्यंत अटळ घरफोडी करणारा असून त्याच्यावर चंद्रपुर, भद्रावती, राजुरा, घुग्गुस, गडचांदूर तसेच वर्धा व यवतमाळ जिल्ह्यात चोरीचे अनेक गुन्हे नोंद आहेत. ही कारवाई पोलीस अधिक्षक श्री कुमार चिता व अप्पर पोलीस अधिक्षक श्री अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक धनराज हाके व स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने केली. सदर आरोपींस पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी पोलीस स्टेशन वणी कडे हस्तांतरित करण्यात आले असून, वणी पोलीस स्टेशन पुढील तपास करत आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील घरफोडीच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यास पोलीस प्रशासनाला मोठा टप्पा गाठता आला.

# दानपेटी फोडणाऱ्या चोरट्यासह कुख्यात गुन्हेगार जेरबंद



प्रतिनिधी २६ डिसेंबर

यवतमाळ – शिरपुर पोलिसांनी चोऱ्यांविरुद्ध जोरदार कारवाई करत ग्राम वरझडी येथील महाकाली मंदिराची दानपेटी फोडणाऱ्या दिनेश निकुरे (वय ३०, रा. वरझडी, ता. वणी, जि. यवतमाळ) याला ताब्यात घेतले. आरोपीने चोरीची कबुली दिली असून, चोरी गेलेले ७,००० रुपये जप्त करण्यात आले आहेत. तपासा दरम्यान, कुख्यात गुन्हेगार नामे शेख आशिक उर्फ तोत्या शेख इब्राहीम (वय ३५, रा. कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ) यांच्या विरोधातील माहिती मिळाली. पोलिसांनी तोसुद्धा ताब्यात घेतला आणि त्याच्याकडून ७ मोटारसायकल जप्त केल्या. यात ५ हिरो होन्डा स्प्लेन्डर, १ हिरो होन्डा पैशन प्रो आणि १ बजाज २२० सीसी पल्सर यांचा समावेश आहे. जप्त केलेल्या वस्तूंची एकूण किंमत २,२८,००० रुपये आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधिक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन शिरपुरचे ठाणेदार सपोनि संतोष मनवर, पोहवा ईक्बाल शेख, अजय वाभिटकर, सुरज साबळे, अविनाश बानकर, पोशि पंकज कुडमेथे, पोशि परमेश्वर दराडे, पोशि दिपक वाकडे आणि पोशि किरण दासरवार यांनी केली.

# पत्रकार दिनेश खांडेकर यांचे निधन

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**पुसद** : दैनिक पब्लिक पोष्ट वृत्तपत्राचे पुसद तालुका प्रतिनिधी तसेच प्रबोधन पर्व आयोजन समिती



पुसदचे उपाध्यक्ष व रिपाइं आठवले पक्षाचे पदाधिकारी दिनेश खांडेकर (रा. संभाजी नगर, पुसद) यांचे आज, २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले.

त्यांचा अंत्यसंस्कार आज दुपारी ३ वाजता त्यांच्या राहत्या घर संभाजी नगर येथून मोक्षधाम पुसद येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, एक मुलगी आणि मोठा आप्त परिवार आहे. समाजाच्या सर्व स्तरातून, मित्रपरिवार व सहकारी यांचा या दुःखद घटनेत सहभाग असून, त्यांच्या परिवाराला दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशी श्रद्धांजली व्यक्त करण्यात येत आहे.

# तालुका अध्यक्षपदी सिद्धार्थ कदम

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**पुसद** : मानव सुरक्षा सेवा ट्रस्टच्या पुसद तालुका अध्यक्षपदी सिद्धार्थ कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही



निवड ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष गजानन एस. इंगळे, संस्थापक सचिव अरुण पांडव, राष्ट्रीय व राज्यस्तरीय पदाधिकारी यांच्या आदेशानुसार व विदर्भ सचिव सूर्यकांत राठोड यांच्या शिफारशीवरून करण्यात आली. सिद्धार्थ कदम हे सामाजिक कार्यात सक्रिय असून विविध उपक्रमांत त्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे पुसद तालुक्यात ट्रस्टच्या सामाजिक, मानवतावादी व जनहिताच्या कार्यांना अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# ओबीसी समाजाच्या विकासासाठी जातनिहाय जनगणना अनिवार्य : प्रा.आर.डी.शिंदे

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**यवतमाळ** : ओबीसी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जातनिहाय जनगणना करणे अत्यावश्यक आहे, असे ओबीसी विचारवंत प्रा. आर. डी. शिंदे (नांदेड) यांनी यवतमाळ येथे महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पर्व २०२५ च्या कार्यक्रमात सांगितले.

प्रा. शिंदे म्हणाले की, १९३१ नंतर देशात ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना झाली नाही. त्यामुळे त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक गरजांची अचूक माहिती उपलब्ध होत नाही आणि कल्याणकारी योजना प्रभावी रित्या लागू करता येत नाहीत. जातनिहाय जनगणना ओबीसी समाजाला विकास प्रक्रियेत सहभागी करण्यासाठी अनिवार्य आहे, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विलास काळे यांनी केले. त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून जातनिहाय जनगणनेचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांनी 'स्मृती पर्व प्रक्रिया आणि मानवतावाद' या विषयावर बीजभाषण दिले. उपस्थितांचा परिचय मायाताई गोरे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष गोविंद चव्हाण होते. प्रमुख अतिथी म्हणून सुनीता काळे, अशोक मोहुरले, प्रा. दीपक वाघ, इंजि. दीपक बोरगामवार, देवराव जिपकाटे, विनोद इंगळे आणि प्रा. सविता हजारे उपस्थित होते. नांदेडचे बी.पी.एस.एस. अध्यक्ष सतीश चंद्र शिंदे देखील उपस्थित होते. सूत्रसंचालन विशाखा येवतकर यांनी केले, तर आभार राहुल पाचघरे यांनी मानले. यशस्वीतेसाठी शशिकांत लोळगे, संजय बारी, डॉ. संजय ठाकूरकर, नरेंद्र भांडारकर, प्रफुल खेडकर, ज्ञानेश्वर रायमल, इंजिनियर ॲड. अरुण सांगळे, माधुरी फेंडर, नीता दरणे, वैशाली फुसे, अनिता गोरे, भावना गुल्हाने, कल्याणी मादेशवार, माधवी पंचबुद्धे, उषा सोनटक्के, शालिनी पिंपळकर, ललिता वाघ, कमल खंडारे, शालिनी शिरभाते, अनिता मेहता, शुभांगी गुल्हाने, अनिल जिपकाटे, नरेंद्र रामेकर, शालिनी मडवे, रूपाली ठाकरे, शीतल दिघडे, वनिता ठाकरे, वंदना डगवार, सोशल मीडिया प्रतिनिधी शुभांगी मालखेडे यांनी सहकार्य केले.

# उड्या, खेळ व कृतीतून गणित समजलं!

## 'सिखे'च्या माध्यमातून रंगले अभिनव गणितीय प्रदर्शन

प्रतिनिधी २६ डिसेंबर



**यवतमाळ** : गणित म्हणजे अवघड आकडे, सूत्रे आणि भीती असा समज आजही अनेकांच्या मनात आहे. मात्र कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा परसोडी (बु.) येथे हा समज सोमवारी मोडीत निघाला. भारतीय महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जन्मदिनानिमित्त जिल्हा परिषद शाळा परसोडी (बु.) आणि 'सिखे' (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने अभिनव गणितीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी केवळ गणिती उदाहरणे मांडली नाहीत, तर 'सिखे'च्या कार्यपुस्तिकेच्या माध्यमातून विविध गणितीय संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून सादर केल्या. शाळेच्या आवारात मोठी संख्यारेषा आखून अपूर्णांकांची बेरीज विद्यार्थ्यांनी उड्या मारत सादर केली. संख्यारेषेवरील अचूक बिंदूवर थांबून बेरीज स्पष्ट करताच उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

शैक्षणिक साहित्याच्या साहाय्याने अंशाधिक अपूर्णांकांची बेरीज, अपूर्णांकांचा लहान-मोठेपणा आणि त्यातील फरक विद्यार्थ्यांनी दृश्य स्वरूपात मांडला. झेंड्यावरील योग्य अपूर्णांक ओळखून त्यांच्या एकक अपूर्णांकासोबत जोड्या लावण्याचा रंजक खेळ सादर करत विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक मारोती बेलखेडे, 'सिखे'च्या टीआयपी उपक्रमातील शिक्षक विशाल हजारे, सरोज शेंडे, रेश्मा हजारे, माध्यमिक शिक्षिका प्रेमिला ठाकरे आदी उपस्थित होते. इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात या प्रदर्शनात सहभाग नोंदवला. 'सिखे'च्या कार्यपुस्तिकेमुळे विद्यार्थ्यांमधील गणिताची भीती कमी होत असून विषयाविषयी आवड निर्माण होत आहे.

विद्यार्थ्यांनी स्वतः कृती करून संकल्पना समजावून सांगितल्या, हे अत्यंत प्रशंसनीय आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापक मारोती बेलखेडे यांनी व्यक्त केली. गणित रंजक पद्धतीने शिकवल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाबाबतही गोडी निर्माण होत असल्याचे शिक्षकांनी नमूद केले. 'सिखे'चे जिल्हा व्यवस्थापक संभाजी भिसे, सहायक जिल्हा व्यवस्थापक नितीन पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली 'सिखे' कोच चेतन जाधव यांनी शाळेतील शिक्षकांसह या प्रदर्शनासाठी विशेष परिश्रम घेतले. या अभिनव उपक्रमामुळे परसोडी येथील जिल्हा परिषद शाळा आणि 'सिखे' संस्थेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# उमरखेडच्या मूलभूत समस्यांचे आव्हान

प्रतिनिधी २६ डिसेंबर

## नूतन नगराध्यक्षांसमोर 'अग्निपरीक्षा'

**उमरखेड** : उमरखेड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कालबद्ध नियोजन आखून मूलभूत सुविधांची पूर्तता करणे, प्रलंबित विकासकामे मार्गी लावणे, स्वच्छता, वाहतूक, पार्किंग, वाढते अतिक्रमण, फेरीवाले, हद्दवाढीतील विकासाचा प्रश्न आदी अनेक समस्या सोडविण्याचे मोठे आव्हान नवनिर्वाचित नगराध्यक्ष तेजश्री संतोष जैन व नगरपरिषदेच्या नवनियुक्त नगरसेवकांसमोर उभे ठाकले आहे.

नगरपरिषद निवडणुकीत काँग्रेस, शिवसेना (उबाठा) व विदर्भ मराठवाडा विकास समितीच्या जनशक्ती पॅनलने निर्विवाद वर्चस्व मिळवत नगरपरिषदेची सत्ता हस्तगत केली आहे. थेट नगराध्यक्षपदी तेजश्री जैन यांची निवड झाली असून १७ नगरसेवक निवडून आल्याने प्रशासनाकडून गतिमान कामकाजाची अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

ग्रामीण भाग जोडलेला असल्याने बुधवारी व शनिवारी होणाऱ्या आठवडी बाजारात मोठी गर्दी उसळते. मात्र, पार्किंगच्या अभावामुळे वाहनचालकांना अडचणींना सामोरे जावे लागत असून रस्त्यावरील अतिक्रमण व खड्ड्यांमुळे वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेषतः बाजार परिसरात महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्याने मोठी गैरसोय होत आहे. लोकनियुक्त नगराध्यक्ष महिला असल्याने हा प्रश्न प्राधान्याने सोडवला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

२०११ मध्ये झालेल्या हद्दवाढीनंतर शहरातील अनेक परिसर आजही विकासापासून वंचित आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, वीजखांब यांचे नियोजनबद्ध काम न झाल्याने नागरी वस्ती वाढूनही विकास खुंटलेला आहे. रहीम नगर व शिवाजी वार्डातील स्मशानभूमी परिसरात पावसाचे पाणी साचत असल्याने नागरिकांच्या घरात पाणी शिरते. अंत्यसंस्कारासाठीही अडचणी निर्माण होत असल्याने या भागाच्या विकासाची मागणी जोर धरू लागली आहे.

खडकपुरा चौक, महात्मा गांधी चौक, माहेश्वरी चौक, नाग चौक तसेच पुसद रोडवरील शाळा परिसरात नियमित वाहतूककोंडी होत असून नगरपरिषद कार्यालयासमोरही हीच स्थिती आहे. खाजगी ट्रॅव्हल्स व ट्रान्सपोर्टच्या वाहनांमुळे समस्या अधिक तीव्र होत आहे.

शहरातील गटार व्यवस्थेचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून पावसाळ्यात रस्त्यांवर पाणी साचते. प्रस्तावित अंडरग्राउंड गटार योजनेची कामे दर्जेदार झाली तर हा प्रश्न कायमस्वरूपी सुटण्याची शक्यता आहे. वाढत्या बांधकामांमुळे शहरातील झाडांची संख्या घटली असून पर्यायी वृक्षारोपण न झाल्याने तापमानात वाढ होत आहे. 'सुंदर उमरखेड' साकारण्यासाठी वृक्षारोपणावर भर देणे गरजेचे आहे.

नगरपरिषदेच्या उत्पन्नातून शॉपिंग कॉम्प्लेक्सचे भाडे, पाणीकर, घरपट्टी, जिल्हा नियोजन समिती व नगरविकास निधी तसेच बँकांतील ठेवींवरील व्याज या सर्वांचा योग्य वापर करून विकासकामे गतीने राबवावी लागणार आहेत. भाजपचे ९ नगरसेवक निवडून आले असून विद्यमान आमदार भाजपचे असल्याने निधी मिळविण्यासाठी सर्वपक्षीय सहकार्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

नवनियुक्त सत्ताधाऱ्यांना उमरखेडचा चेहरामोहरा बदलण्यात कितपत यश मिळते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### वाढत्या फेरीवाल्यांना शिस्त गरजेची

- शहरात रस्त्याच्या कडेला फेरीवाल्यांची संख्या वाढली असून त्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण होत आहे. फेरीवाल्यांचे योग्य नियोजन करून त्यांना ठरावीक जागा देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### तिरंगाची शान अबाधित ठेवा

- महात्मा गांधी चौकातील शंभर फूट उंच तिरंगा खांबावर तांत्रिक अडचणी दूर करून नियमित ध्वजारोहण करण्यात यावे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

### भाजपची 'होम पिच'वर पीछेहाट

- भाजपचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या उमरखेड नगरपरिषदेत जनशक्ती पॅनलने सत्ता मिळविल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

# फळविक्रेत्याची मुलगी 'अक्षरा' राष्ट्रीय हॉकी संघात

## राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार

प्रतिनिधी २६ डिसेंबर



**यवतमाळ** : लोहारातील फळविक्रेता निलेश भारसाखळे आणि पत्नी दीपाली यांची कन्या, अक्षरा भारसाखळे, महाराष्ट्र राज्याच्या चौदा वर्षाआतील मुलींच्या हॉकी संघात निवडली गेली आहे. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असतानाही, पालकांनी अक्षराला शालेय हॉकीत प्रगती करता यावी म्हणून श्री साई माध्यमिक विद्यालयात प्रवेश करून नियमित सरावासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या.

अक्षराने कठोर मेहनत, दृढ आत्मविश्वास, चिकाटी आणि कौशल्य यांद्वारे राज्य स्तरावर आपली छाप सोडली. तिच्या या यशामुळे तिला 69 व्या शालेय राष्ट्रीय मुलींच्या हॉकी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. ही स्पर्धा 1 ते 7 जानेवारी 2026 दरम्यान मध्यप्रदेश राज्यातील ग्वालियर येथे होणार आहे.

अक्षराला तिच्या यशासाठी शाळेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब इंगोले, माजी मुख्याध्यापक मनोज इंगोले, मुख्याध्यापक अजय भटकर, आंतरराष्ट्रीय हॉकीपटू आकाश चिकटे आणि शारीरिक शिक्षण शिक्षक व क्रीडा प्रशिक्षक जितेंद्र सातपुते यांनी मार्गदर्शन केले. तिच्या कामगिरीचे कौतुक जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड, जिल्हा शारीरिक शिक्षण संघटनेचे अध्यक्ष व प्राचार्य मनोज येंडे, उद्योगपती सुशील कोठारी, क्रीडा अधिकारी चैताली राऊत, सचिन हरणे, डॉ. सुरेंद्र भुयार, डॉ. संतोष भोसले, डॉ. धिरज बत्रा, शाळेचे वनदेव माघाडे, विजय चौधरी, अभय दुधाटे, अर्चना डहाके, जयश्री देशमुख, वैशाली शहाडे, किशोर यादव, रवी उईके, हॉकीपटू विकी गिरी आणि प्रथमेश ठोकळ यांनी केले. अक्षराच्या या यशामुळे लोहाराचा क्रीडा इतिहास उजळून निघाला आहे. तिच्या पालकांचे प्रोत्साहन आणि कठोर सराव यांनी अक्षराला राष्ट्रीय स्तरावर पोहोचवले.

शालार्थ आयडी घोटाळा, पैसा केला गोळा...






# शिक्षण विभागात घोटाळा पुन्हा पुन्हा,

# चौकशीतून दाखल होणार गुन्हा !

*** भरती थेट, बॅक डेट वरिष्ठांना केले सेट * शिक्षक होणार गार, बंद होणार पगार**

*** विशेष शिबिरामध्ये दिलेल्या शेकडो मान्यतेची एसआयटीच्या मार्फत चौकशीची मागणी**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम नागपूर विभागातच नव्हे तर राज्यातील सर्व विभागातील शिक्षण विभागात मागील अनेक वर्षापासून सुरू असलेल्या बोगस शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती प्रकरणाची शासनाने एसआयटीद्वारे चौकशी सुरू केली आहे. वाशीम जिल्ह्यात २००५ पासूनच माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागात 'बॅकडेट' मान्यता प्रकाराचा 'श्रीगणेशा' झाल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागातील शालार्थ आयडी घोटाळयाबरोबरच २००५ पासून दिलेल्या सर्व शिक्षक, शिक्षकेत्तरांच्या मान्यता आदेशाची व बोगस भरतीची एसआयटीद्वारे सखोल चौकशी सुरू झाली असून जिल्ह्यात शिक्षण विभागात भ्रष्टाचार पुन्हा पुन्हा झाला असून आता गुन्हा दाखल होणार आहे.




वाशीम जिल्ह्यात माध्यमिक शिक्षण विभागात मागील २० वर्षात काही मोजक्या शिक्षणाधिकाऱ्यांचा अपवाद वगळता बहुतांशी शिक्षणाधिकाऱ्यांनी बोगस व बॅकडेटमध्ये शिक्षकांच्या व शिक्षकेत्तरांच्या शेकडो नियमबाह्य नियुत्त्यांना मान्यता देवून लाखोची माया जमा केली. त्यामध्ये काहींनी शिक्षणाधिकाऱ्यांने तर कोट्यवधीचा आकडा पार केला असल्याचीही शिक्षण विभागात चर्चा आहे. वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागात विशेष शिबीराचे आयोजन करून तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी शेकडो बोगस नियुत्त्यांना मान्यता प्रदान करून लाखोचा मलिदा लाटला होता. 'या' विशेष शिबीरासाठी कोणत्याही वरिष्ठांची मान्यता न घेताच तत्कालीन भ्रष्ट शिक्षणाधिकाऱ्यांनी स्वत: मालामाल होवून कथित शिक्षण संस्थाचालकांनाही कोट्यवधीची कमाई करून दिल्याचे वास्तव आहे. लाभार्थी संस्थाचालकांमध्ये अनेक आजी - माजी लोकप्रतिनिधी, अल्पसंख्यांक संस्था चालक व अनेक दलालानी शिक्षणक्षेत्राचे पावित्र्य नष्ट करुन शिक्षणक्षेत्राची 'वाट' लावल्याचीही चर्चा आहे.

## आजी - माजी लोकप्रतिनिधीच्या अल्पसंख्यांक संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस भरती

अमरावती विभागाचे माजी शिक्षण उपसंचालक रामधन पवार यांनी वाशीम जिल्ह्यातील शिक्षण विभागातील बोगस भरतीची चौकशी नोव्हेंबर २०१४ मध्ये करुन वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील पाचशेच्या जवळपास बोगस भरतीची यादी तयार केली होती. तत्कालीन शिक्षणाधिकारी लबडे व तेलगोटे यांना अकोला येथील एका प्रतिष्ठीत हॉटेलमध्ये ३१ डिसेंबर २०१४ च्या रात्री बोलावून वाशीम जिल्ह्यातील बोगसभरती प्रकरण रफादफा करण्यासाठी चक्क 'एक खोक्याची' मागणी केली होती, पण त्या दोन्ही 'धुर्त' अधिकाऱ्यांनी पवार यांची खोक्याची मागणी फेटाळून पावारांनाच चॅलेंज केले. नंतर संतापलेल्या पवारांनी वाशीम जिल्ह्यातील अनसिंग, आसेगाव, मंगरूळपिर, कारंजा ग्रामिण पोलीस ठाण्यात बोगसभरती केलेल्या संस्थाचालक, कर्मचारी आणि लबडे, तेलगोटे या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले असल्याचीही शिक्षणक्षेत्रात चर्चा आहे. वाशीम जिल्ह्यात मागील २० वर्षापासून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागात बोगस व बॅकडेट मध्ये भरती प्रक्रिया खुलेआम सुरू आहे. माध्यमिक शिक्षण विभागात एक वर्षापुर्वी प्रभार असलेल्या अधिकाऱ्याने तर वाद असलेल्या संस्थासह, अल्पसंख्यांक संस्थेमध्ये नियमबाह्य मान्यता देवून कोट्यवधीची कमाई केल्याची पण शिक्षण विभागात खमंग चर्चा सुरु आहे. एसआयटीने वाशीम जिल्ह्यातील मागील २० वर्षात झालेल्या माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागातील घोटाळ्याची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून केल्या जात आहे. तरी एसआयटी विभागाने निपक्षपणे चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी होत आहे.

## घोटाळा आला गळ्यात, मोठा मासा जाळ्यात...

रविंद्र काटोलकर २४ डिसेंबर २०२१ रोजी नागपुरात प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून रुजू झाले. २० मार्च २०२२ पर्यंत ते जिल्हा परिषदेत असताना त्यांना अनेक शिक्षण व कर्मचाऱ्यांचे शालार्थ आयडी बनावट असल्याची माहिती होती. परंतु वेतन संबंधात शाळेकडून आलेल्या प्रस्तावाची कुठलीही शहानिशा न करता त्यांचे थकीत वेतन देण्याची प्रक्रिया राबविली. त्यातून त्यांनी शासनाची १२ कोटींपेक्षा अधिक रकमेची शासनाची फसवणूक केल्याच्या प्रकरणी त्यांना अटक करण्यात आली. शालार्थ आयडी घोटाळयातील अटकेतील आरोपींची संख्या आता एकूण २७ वर गेली आहे. यामध्ये तीन शिक्षण उपसंचालक, चार शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक, तीन मुख्याध्यापक, दोन शाळा संचालक यांच्यासह सहायक शिक्षक, सहा लिपीक व कनिष्ठ लिपीकांचा समावेश आहे. अशाच प्रकारची शालार्थ आयडी घोटाळयाची चौकशी वाशीम जिल्ह्यात झाल्यास अनेक मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता आहे .




## थोडक्यात

### नागी येथे तीन ठिकाणी धाडसी घरफोडी

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर तालुक्यातील इचा नागी येथे दिनांक २४ डिसेंबर च्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी तीन ठिकाणी घरफोडी करून ९ लाख ३५ हजार ५०० रुपयाचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादीमोहन रामदास राउत वय ४५ वर्ष यांनी फिर्यादीत असे नमूद केले की दिनांक २४ डिसेंबर रोजी माझी आई रात्री अंदाजे ०३/१५ वाजताचे सुमारास पाणी पिण्यासाठी उठली असतांना आईला घरातील सामान अस्ताव्यस्त दिसले म्हणून फ्रियादीला उठवले असता, लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने दिसुन आले नाही. याप्रकारणी अज्ञात चोरटया विरुध्द कलम ३३१(४), ३०५ँ.ॅ. ए.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास ठाणेदार किशोर शेळके यांच्या मार्गदर्शनात सपोनि शुभांगी थोरात करीत आहे.

## माळेगावातील स्पर्धेत वाशिमच्या अश्वाचा दुसरा नंबर !

### नांदेड जिल्ह्यात खंडोबा यात्रोत्सवानिमित्त पशुप्रदर्शनी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

खंडोबा यात्रोत्सवानिमित्ताने नांदेड जिल्हयातील लोहा तालुक्यांतर्गत येत असलेल्या माळेगाव येथे दि.१९ डिसेंबरला आयोजित पशुप्रदर्शनीत वाशिम येथील गोपाल रंगभाळ यांच्या अश्वाने व्दितीय क्रमांक मिळवित ३१ हजाराचे पारितोषीक पटकाविले.

नांदेड जिल्हातील लोहा तालुक्यांतर्गत माळेगाव येथे दरवर्षी खंडोबा यात्रोत्सवा निमित्ताने पशुप्रदर्शनीचे आयोजन केल्या जाते. त्यानुसार, आयोजित दोन दाती अश्व स्पर्धेत वाशिम येथील गोपाल रंगभाळ यांच्या अश्वाने व्दितीय क्रमांकाचे ३१ हजार रुपये बक्षीस पटकाविले. यामध्ये प्रथम



क्रमांकाचे बक्षीस सुरजीतसिंग गिरणीवाले यांच्या अश्वाने ४१ हजार रुपये तर तृतीय क्रमांकाचे २१ हजाराचे बक्षीस बीड जिल्हयातील केज येथील पृथ्वीराज पाटील यांच्या अश्वाने पटकाविले. नांदेड जिल्हातील स्पर्धेत वाशिमच्या अश्वाने व्दितीय क्रमांक पटकवित वाशिम जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तूरा रोवला.

## कारंजा येथे श्री संताजी महाराजांचा जयंती महोत्सव !

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

समस्त तेली समाज बहुउद्देशीय संघटनेच्या वतीने तेली समाजाचे दैवत संत शिरोमणी श्री.संताजी जगनाडे महाराज यांचा जयंती महोत्सव व तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा २५ डिसेंबर रोजी स्थानिक महेश भवन येथे उत्साहात पार पडला. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक वैशालीताई गुल्हाने, नितीन गढवाले, अमोल गढवाले यांचा सत्कार करण्यात आला. खासदार तथा महाराष्ट्र प्रा.तैलिक महासभेचे अध्यक्ष रामदास तडस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या महोत्सवाचे उद्‌घाटन आमदार सईताई डहाके यांच्या हस्ते करण्यात आले, उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कैलास



देवरे, महाराष्ट्र प्रांतिक तेली महासभेचे जिल्हाध्यक्ष शिवदास सूर्य पाटिल, अ.भा.तै.साहू संघटनेचे राष्ट्रीय संघटक सुभाष घाटे समस्त तेली समाज महिला संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती प्रमिलाताई जिरापुरे, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल खोरगडे, वाशीम येथील अस्थिरोग तज्ञ डॉ.श्याम काटेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजुभाऊ गुल्हाने, कारंजाचे नायब तहसिलदार अनिल वाडेकर, नगरसेवक नितिन गढवाले, राज्य तेली समन्वय समिती अध्यक्ष प्रकाश डवले, संताजी मेडिकोज महाराष्ट्र राज्य, अध्यक्ष डॉ.प्रदीप पंडित, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, सुनील गुल्हाने, माजी पंचायत समिती सदस्य दिनेश वाडेकर, डॉ.मोहनराव धाडवे, क्विक किंगडम क्रिकेट अकॅडमीचे मयूर तायडे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गजानन वाघ उपस्थित होते. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी कारंजा येथील समस्त तेली समाज बहुउद्देशीय संघटनेचे अध्यक्ष किरण रा.क्षार, उपाध्यक्ष अतुल गुल्हाने, उपाध्यक्ष अतुल ढोरे, सचिव सुनिल दहापुते, सहसचिव संदीप गढवाले, कोषाध्यक्ष विनय गुल्हाने, सदस्य प्रविण राठोड, गजानन झंझाट, अनिल सुड़के, सदस्य प्रशांत बिजवे, बाबुराव ना.सरोदे, किशोर पाठे, सतीश क्षीरसागर, दिपक गोदे, गणेश गुल्हाने व सोहळ्याचे अन्नदाते गजानन गढवाले, राजेश गढवाले, तुषार गढवाले आदींनी परिश्रम घेतले .

## समनक जनता पार्टी जिल्हा परिषदेच्या सर्व जागा लढणार!

***वाशिम येथे पार पडली जिल्हास्तरीय बैठक * सर्कल निहाय पदाधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

समनक जनता पार्टीची जिल्हास्तरीय बैठक दि. २५ डिसेंबर रोजी स्थानिक संत सेवालाल महाराज संस्थान येथे पार पडली. या बैठकीत आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सर्व जागा स्वबळावर लढण्याची घोषणा करण्यात आली. या बैठकीला प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय महासचिव प्रा. डॉ. अनिल राठोड हे होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रदेशाध्यक्ष डॉ. रामकृष्ण कालापाड हे होते.

यावेळी मंचावर जिल्हाध्यक्ष गजानन धामणे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष शितल राठोड, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश धुळधुळे, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष चंदूभाई बेनीवाले, मंगरूळपीर महिला आघाडी तालुकाध्यक्ष नीता चव्हाण, मालेगाव




बैठकीला संबोधित करताना प्रा. डॉ. अनिल राठोड, डॉ. रामकृष्ण कालापाड, जिल्हाध्यक्ष, गजानन धामणे व इतर मान्यवर

तालुकाध्यक्ष चंदन राठोड, वाशिम तालुकाध्यक्ष डॉ. संदीप आडे, मंगरूळपीर तालुकाध्यक्ष गजानन पवार, रिसोड तालुक्यातील उपसरपंच इंजि. नितेश जाधव, नेमीचंद महाराज आदी उपस्थित होते. या बैठकीत विविध सर्कल मधील पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीबाबतचा आढावा सादर केला.

यावेळी सर्कलनिहाय उमेदवारी देण्याबाबत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी जिल्ह्यातील विविध सर्कल मधील इच्छुक उमेदवार उपस्थित होते. त्यांनी आपल्या उमेदवारीबाबत विचार व्यक्त केले. याप्रसंगी, प्रा. डॉ. अनिल राठोड यांनी पक्षाची ध्येय धोरणे विशद करून खऱ्या अर्थाने लोकशाही वाचविण्यासाठी जय मानवता, जय संविधान, जय भारत, जय विज्ञान, जय जवान, जय किसान हे ब्रीदवाक्य घेऊन प्रस्थापित राजकारणाला बगल देत लोकप्रतिनिधित्वापासून वंचित असलेल्या सर्व जातींमधील कार्यकर्त्यांना उमेदवारी देणार असल्याचे जाहीर केले. तसेच निवडणूकिच्या तयारीबाबत पदाधिकाऱ्यांना सूचना केल्या. अध्यक्षीय मनोगतातून डॉ. रामकृष्ण कालापाड यांनी बोलताना सांगितले की, आजही बहुजन समाजातील अनेक जातींना प्रचलित पक्षांकडून उमेदवारी दिल्या जात नाही. काही ठराविक लोकांचीच राजकारणावर मक्तेदारी आहे. ही मक्तेदारी मोडीत काढून छोट्या छोट्या जात समूहाला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची उमेदवारी दिली जाणार असल्याचे सांगितले.

तसेच लवकरच सर्कल निहाय उमेदवार निश्चित करणार असल्याचे सांगितले. जिल्हाध्यक्ष गजानन धामणे यांनी प्रास्ताविकातून, जिल्हा परिषद निवडणुकीला सामोरे जाताना पक्षाचा अजेंडा, आणि निवडणुकीच्या मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. तसेच पक्षात काम करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांनी स्वाभिमानाने पक्षात सहभागी व्हावे असे आवाहन केले. तसेच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ताकतीने कामाला लागण्याच्या सूचना केल्या. या बैठकीला जिल्हाभरातील सर्व सर्कल मधील विविध गावातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित बहुतांश कार्यकर्त्यांनी आपले निवडणुकीबाबत मनोगत व्यक्त केले. यावेळी रिसोड तालुक्यातील भर जहागीर सर्कल मधील शेकडो कार्यकर्त्यांनी तसेच जिल्ह्यातील विविध गावांमधील नागरिकांनी पक्ष प्रवेश केला. यावेळी मान्यवरांनी पक्षाचा शेला गळ्यात टाकून तसेच पुष्पगुच्छ देऊन पक्षप्रवेश करून घेतला. या बैठकीला जिल्ह्यातील शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन निलेश राठोड यांनी केले. बैठकीच्या प्रारंभी यशोमती गजानन धामणे हिने संविधानाची प्रास्ताविका सादर केली. बैठकीचा शेवट राष्ट्रगीताने झाला.

## फार्मर आयडीतील तांत्रिक अडचणी तात्काळ दूर करा - अजिंक्य मेडशीकर

● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या ?ग्री स्टॅक अंतर्गत फार्मर आयडी (ईंसै घ्ञ) योजनेत मोठ्या प्रमाणावर तांत्रिक त्रुटी आढळून येत असून, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा गंभीर मुद्दा मेडशी येथील शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. या तांत्रिक अडचणी तात्काळ दूर करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी ठाम मागणी मेडशी येथील शेतकरी अजिंक्य मेडशीकर यांनी उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांसाठी ॲग्री स्टॅक अंतर्गत फार्मर आयडी सक्तीची केली असून, याच फार्मर आयडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची जमीनधारणा, सातबारा नोंदी, पीक क्षेत्र, तसेच विविध शासकीय योजनांची माहिती शासनाकडे नोंदविण्यात येत आहे. शासनाच्या म्हणण्यानुसार, फार्मर आयडीच्या आधारे शेतकऱ्यांना भविष्यातील सर्व शासकीय योजना, सवलती, अनुदान, पीक विमा तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानभरपाईचा लाभ मिळणार आहे.

वाशिम जिल्ह्यातील बहुतांश सातबारा धारक शेतकऱ्यांनी शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत आपली फार्मर आयडी काढून घेतली आहे. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणीदरम्यान मोठ्या प्रमाणावर तांत्रिक त्रुटी समोर येत असल्याचे निदर्शनास येत आहे. मेडशी येथील शेतकरी अजिंक्य मेडशीकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, फार्मर आयडीमधील या तांत्रिक त्रुटी तात्काळ दूर करून शेतकऱ्यांच्या सर्व जमिनींची अचूक नोंद करण्यात यावी.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com


# अकोल्याच्या सत्तेचा महासंग्राम !

## ◆ 'आर आर सी महाचर्चा'तून विकासाच्या मुद्द्यांवर थेट चर्चा

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अकोला :** आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अकोल्याच्या राजकीय वातावरणात चांगलीच खळबळ उडाली असून, आर आर सी न्यूजच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांची शहरात चर्चा आहे. विकसित अकोल्यासाठी आर आर सी ची 'महाचर्चा' शहराच्या राजकारणाचे केंद्रबिंदू ठरणार आहे. महापालिका निवडणुकीत रणसंग्राम, बिग फाईट, आवाज जनतेचा आणि धुरंधर यांसारख्या गाजलेल्या कार्यक्रमांनंतर आता थेट मतदारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी हा विशेष चर्चासत्र कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मुख्यतः मतदार जागृतीसाठी हा कार्यक्रम असून या कार्यक्रमाची मोठी चर्चा शहरात आहे.

या महाचर्चेत सर्वपक्षीय दिग्गज नेते, निवडणूक रिंगणात उतरलेले प्रमुख उमेदवार तसेच शहरातील सजग नागरिक एकाच व्यासपीठावर सहभागी होणार आहेत. शहराचा




विकास, नागरी सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि प्रशासनातील पारदर्शकता या महत्त्वाच्या मुद्द्यांवर थेट प्रश्नोत्तरांची रंगतदार चर्चा रंगणार आहे. आर आर सी न्यूजच्या या व्यासपीठावर केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप न होता, अकोल्याच्या विकासाचा स्पष्ट आराखडा अर्थात ब्लूप्रिंट मांडला जाणार आहे. शनिवारी होणाऱ्या या कार्यक्रमाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले असून, राजकारण्यांना थेट जनतेच्या प्रश्नांना उत्तर देण्याची संधी मिळणार आहे.

या महाचर्चेत व्यापारी, डॉक्टर, वकील, पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर नागरिक सहभाग घेणार असून, मतदार जनजागृती हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. 'केवळ मतदान नव्हे, तर विचारपूर्वक मतदान' हा संदेश देत आर आर सी न्यूजने उचललेले हे पाऊल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे मानले जात आहे. सध्या शहरभर 'आर आर सी महाचर्चा' या कार्यक्रमाची जोरदार चर्चा असून, हा कार्यक्रम अकोल्याच्या राजकीय चर्चांना नवी दिशा देईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# रेल्वे स्थानक, बस स्थानकावर तुफान गर्दी

प्रतिनिधी २६ डिसेंबर



**अकोला :** ख्रिसमस आणि सुट्ट्यांमुळे अकोला रेल्वे स्थानक आणि बस स्थानकावर प्रवाशांची गर्दी दिसते. रेल्वे तिकीट बुकिंगसाठी प्रचंड गर्दी दिसून येत आहे. त्याचबरोबर अकोल्यातून विविध ठिकाणांकडे जाणाऱ्या गाड्यांना प्रवाशांची 'हाऊसफुल्ल' गर्दी उसळली आहे. रेल्वे दरवाढीचा परिणाम जाणवला नाही.

गुरुवारी ख्रिसमसची सुट्टी असल्याने शिर्डीसह विदर्भाची पंढरी मानल्या जाणाऱ्या शेगाव या संतनगरीत भाविकांची मोठी गर्दी झाली होती. येथे भाविकांना श्रींच्या दर्शनासाठी ३ तासांचा वेळ लागला. नवीन वर्षापर्यंत चालणाऱ्या सुट्ट्यांमुळे धार्मिक स्थळे आणि पर्यटन क्षेत्रांकडे जाणाऱ्यांची प्रचंड गर्दी लक्षात घेता भारतीय रेल्वेने विशेष गाड्या चालवण्याचे नियोजन केले आहे, तर दुसरीकडे धार्मिक स्थळांवरही विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

रेल्वे सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार शेगाव, मुंबई, शिर्डी, गोवा, पंढरपूर, तुळजापूर यासह राजस्थान, गुजरात, जम्मू-काश्मीर आणि हावडा अशा लांब पल्ल्याच्या धावणाऱ्या गाड्यांनाही प्रवाशांची मोठी गर्दी आहे. यामुळे या सर्व गाड्यांचे तिकीट बुकिंग हाऊसफुल्ल असून शेकडो प्रवाशांची नावे वेटिंग लिस्टमध्ये आहेत. अकोला मुख्य बस स्थानकावर आगामी सुट्ट्यांमुळे प्रवाशांची मोठी गर्दी दिसून येत आहे. २५ डिसेंबरपासून ते १ जानेवारीपर्यंत नवीन वर्षाचा उत्साह साजरा करण्यासाठी प्रवाशांकडून एसटी बसला पसंती दिली जात आहे. रेल्वेचे तिकीट उपलब्ध नसल्यामुळे आणि रेल्वेतील प्रचंड गर्दी पाहता प्रवाशांनी जिल्ह्यांतर्गत तसेच लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी बसने प्रवास करणे अधिक पसंत केले आहे. बस स्थानक प्रशासनाकडून प्रवाशांच्या सोयीसाठी जास्तीत जास्त बसेसचे नियोजन करून अतिरिक्त बसेस सोडल्या जात आहेत.



# सलग सुट्ट्यांमुळे संतनगरी हाऊसफुल्ल

## ◆ एक लाखावर अधिक भाविकांनी घेतले श्रींचे दर्शन

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**खामगाव :** श्री संत गजानन महाराजांचे मंदिरामुळे विदर्भ पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संतनगरी शेगावला गुरुवार, शनिवार, व रविवार रोजी ख्रिसमस निमित्त सलग सुट्टी तसेच दिवाळी सारखी नाताळ सणानिमित्त मुंबई पुणे यासह अन्य ठिकाणच्या शाळा महाविद्यालय ऑफिसेसला असणाऱ्या दीर्घकालीन सुट्ट्यांमुळे शेगावला श्रींचे दर्शनास मोठ्या प्रमाणावर भाविक

गर्दी उसळली आहे. दरवर्षी शेगावला नाताळमध्ये श्रींचे दर्शनासाठी अनेक ठिकाणाहून भाविक भक्तांचा ओढा मोठ्या प्रमाणावर असतो. श्रींचे दर्शन तसेच आनंद सागर या आध्यात्मिक केंद्राचे अवलोकन करण्यासाठी शेगावला हे भाविक येतात. शेगाव येथे येणाऱ्या सर्व रेल्वेगाड्या, एस टी बसेसमधून मोठ्या प्रमाणात प्रवासी बाहेर पडताना दिसतात. यामुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. श्रींचे







दर्शनासाठी भाविकांना सरासरी तीन तास व श्रीमुख दर्शनासाठी ४० मिनिटे अवधी लागत आहे. श्री संस्थानकडून भाविक भक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी सर्वतोपरी काळजी घेण्यात येत आहे भाविकांसाठी एकेरी मार्ग करण्यात आला असून मंदिरामध्ये सकाळी १० ते ५ पर्यंत महाप्रसाद हजारो भाविकांनी लाभ घेतला आहे. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात निवास व्यवस्था वारकरी निवास, भक्त निवास विसावा , विहार या ठिकाणी करण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारे भक्तांची गैरसोय होऊ नये याची पूर्ण काळजी श्री संस्थानकडून घेतली जात आहे. श्री संस्थांनचे पाकिगमध्ये मोठ्या प्रमाणावर भाविकांची वाहने शिस्तबद्ध उभी असल्याचे दिसून येत आहे .तर मंदिर परिसरात व खाजगी पाकिग सुद्धा हाऊस फुल झाले आहे.

# पोपटखेड येथे टाळ मृदंगाच्या गजरात गोमातेचा जयजयकार

## ◆ हजारो भाविकांनी घेतला महाप्रसाद

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अकोट :** आदिवासी समाज बांधवांचे ग्राम दैवत गोमाता मंदिरात यात्रा भरते. मंदिरात संकट मोचन हनुमानजी विराजमान असून त्यासमोर गोमातेची समाधी पुरातन काळापासून आहे. बाजूला महादेव शिवलिंग, समोर नंदिकेश्वर, बाजूलाच महाकाय त्रिशूल आहे.

मंदिर पोपटखेड धरणाच्या भिंतीला लागून आहे. धारगड यात्रा, शहाणूर जंगल सफारी, नरनाळा किल्ला, पोपटखेड धरण याच रोडवर गजानन महाराज विहीर म्हणून गावाची महाराष्ट्रात ओळख आहे. गोमाता यात्रा महोत्सव तीन दिवस असतो. कबड्डी स्पर्धा, भव्य शंकरपट स्पर्धेचे आयोजन केले जाते. संपूर्ण आदिवासी समाजाचे स्नेह संमेलन भरते. गुरुवार २४ ला सकाळी गावामधून गोमाता पालखीमध्ये प्रतिमा ठेवून पूजा अर्चना करत व टाळ मृदुंग, भाविकांनी गजर करीत मिरवणूक काढली.

गावामध्ये साफसफाई, रांगोळ्या काढल्या



होत्या. वाजत गाजत मिरवणूक मंदिरात परत आली. गोमातेची आरती व जयजयकार करत दहीहंडीचा कार्यक्रम झाला. बाहेरगावावरून आलेल्या दिंड्या व डफळे वाजंत्री मंडळीचे गोमाता उत्सव समितीद्वारे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी या भंडाऱ्यामध्ये महाप्रसाद ग्रहण केला. या यात्रेत वीर एकलव्य बचाव पथकाचे अध्यक्ष पांडुरंग तायडे व सरपंच गजेंद्र तायडे, ग्रामपंचायत सदस्य , व गोमाता यात्रा उत्सव समिती, गोमाता क्रीडा मंडळ समिती, संपूर्ण गावकऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या मार्गदर्शनात चोख बंदोबस्त होता.

# पोलिसांकडून गावातील पतंग विक्री दुकानांची झाडाझडती

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**हिवरखेड:** पोलिसांनी गावात व पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या आजूबाजूच्या खेड्यापाड्यात जाऊन पतंग विक्रीच्या दुकानात जाऊन चायनीज मांजाची चौकशी केली. चायनीज मांजा विक्री करताना आढळून आल्यास त्याच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# आर.डी.जी. पब्लिक स्कूल मध्ये अद्ययावत संगणक प्रयोगशाळेचे थाटात उद्घाटन

प्रतिनिधी २६ डिसेंबर

## ◆ विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला चालना देणारी प्रयोगशाळा

**अकोला :** स्थानिक आर.डी.जी. पब्लिक स्कूल मध्ये २४ डिसेंबर रोजी सकाळी अद्ययावत संगणक प्रयोगशाळेचे थाटात उद्घाटन करण्यात आले. यावेळी आर.डी.जी. पब्लिक स्कूलचे संचालक दिलीपराजजी गोयनका, सौरभ गोयनका, शाळेचे प्राचार्य कुरियचन सी.पी., उपप्राचार्या श्वेता चोमवाल, विदर्भ चेम्बर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष निकेश गुप्ता आणि वरिष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या व्यतिरिक्त एस.एम.सी. सदस्यही उपस्थित होते.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फीत कापून संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचे गुलाब पुष्प आणि भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक तसेच निकेश गुप्ता आणि



सिद्धार्थ रूहाटीया यांनी संगणक प्रयोगशाळेच्या डिझाईनची मुक्तकंठाने प्रशंसा केली. तसेच ही प्रयोगशाळा विद्यार्थ्यांसाठी खूप आवश्यक आणि फायदेशीर असल्याचेही ते म्हणाले. आर.डी.जी. पब्लिक स्कूलचे संचालक दिलीपराजजी गोयनका यांनीही विचार व्यक्त केले. या प्रयोगशाळेत पी.एल.ए. बेस्ड थ्रीडी प्रिंटर तसेच ४२ संगणक आहेत. हे सर्व संगणक लॅन सिस्टीमशी जुळलेले आहेत. या सोबतच येथे डी.जी. बोर्ड सुद्धा लावण्यात आले आहे. कार्यक्रमाचे संचालन वर्ग दहावीची विद्यार्थिनी अनन्या बेलोकार हिने केले तर सौरभ गोयनका यांनी आभार व्यक्त केले

# 'नंदिनी ग्रुप'ची मासिक सभा उत्साहात साजरी



प्रतिनिधी २६ डिसेंबर

**अकोला :** महिलांच्या कलागुणांना वाव देत मैत्री, एकोप्याची भावना आणि सामाजिक जाणीव वाढवण्याच्या उद्देश जपत तसेच पंजाबराव देशमुख व डॅडी देशमुख यांच्या जयंतीचे औचित्य साधून दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी देशमुख महिला मंडळातील 'नंदिनी ग्रुपची' मासिक सभा हॉटेल सेंटर प्लाझा येथे उत्साहात झाली.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानी राजश्रीताई, उपाध्यक्ष नयनाताई, सचिव स्वप्नाली , जेष्ठ सल्लागार कविताताई , कोषाध्यक्ष प्रतिभाताई, प्रमुख अतिथी वर्षा देशमुख, ग्रुप लीडर विजयाताई यांची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कविताताई यांनी केले तर प्रोजेक्टची माहिती ज्योतीताई यांनी दिली तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचय उज्वला यांनी करून दिला. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या खुमासदार आणि विनोदी शैलीतील मनोगताने उपस्थितांची मने जिंकून घेतली. तर अध्यक्षीय मनोगतातून पुढील वर्षाची दिशा ठरली. ख्रिसमस व नवीन वर्षाचे स्वागत ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून आयोजित सभेत नंदिनी ग्रुपच्या सदस्यांनी बहारदार नृत्य सादर केली .मनोरंजक खेळ ,बहारदार सादरीकरण यामुळे कार्यक्रमाची रंगत वाढली. याप्रसंगी घेण्यात आलेल्या पासिंग द बॉल या गेमच्या विजेता आहेत सोनाली, योगिनी ,चंदा तसेच हौजी गेमच्या विजेत्या आहेत संगीता, श्रद्धा, प्राची, छाया, सीमा, राजश्री ,शिला, माधुरी, उज्वला, स्वप्नाली, अनिता, प्रगती, शितल, संजीवनी, आराधना, जयश्री, प्रांजली, अरुणा, प्रियंका तसेच ड्रेस कोड थीमच्या विजेता आहेत सुषमा, सीमा, शिल्पा, सोनाली, पौर्णिमा. समाजात सकारात्मक विचारांना चालना देणारा एक प्रेरणादायी उपक्रम म्हणजे पुनर्विवाह परिचय मेळावा मंडळांनी आयोजित केला होता. या माध्यमातून दोन विवाह जुळून आले त्यापैकी अभिषेक देशमुख व माधूरी देशमुख या नवदांपत्याचे स्वागत मंडळाच्या वतीने करण्यात आले व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

ख्रिसमस व नववर्षाचे स्वागत थीम असलेले कार्यक्रम स्थळ हे सुंदर रांगोळी ,ख्रिसमस ट्री, रंगीबेरंगी लाईट्स, सांता कॅप्स, फुगे ,कँडल्स, फ्लावर्स अशा आकर्षक सजावटीने नटले होते. उपस्थित सदस्यांनी थीम नुसार पोशाख परिधान करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. 'आर्ट ऑफ लिविंग' च्या सदस्या अँड. कांचन शिंदे मॅडम यांनी मेडिटेशन आणि आनंदी जीवन जगण्याचे महत्त्व पटवून दिले. उपस्थित सदस्यांनी त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण अनुभवले. देशमुख महिला मंडळातील सर्व सदस्यांनी एकत्रित येत, एकमेकांशी संवाद साधत सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे जल्लोषात स्वागत केले. स्नेहभोजनाने या कार्यक्रमाची समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचलन मंजू देशमुख व भावना देशमुख यांनी केले. तर सर्वांचे शब्द सुमनांनी स्वागत डॉ. शिवानी ने केले. तर आभार प्रदर्शन वैशाली ने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नंदिनी ग्रुपच्या सर्व सदस्या तसेच कविता ढोरे, ज्योतीताई, संध्याताई, इंदू ताई, विजया , मंजुषा , अनघा , शुभांगी, उज्वला , वैशाली , मीना , डॉ. शिवानी , दिप्ती , भावना , विद्या , स्मिता यांनी परिश्रम घेतले.

# माजी सरपंच महीलेची राहत्या घरी आत्महत्या

प्रतिनिधी २६ डिसेंबर

**दर्यापूर :** तालुक्यातील गायवाडी ग्रामपंचायतीच्या माजी महीला सरपंचा यांनी दर्यापूर शहरातील नारायण नगर येथील राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना गुरवार (दि.२५ ) दुपारच्या सुमारास उघडकीस आली. दरम्यान घटनेची माहिती शहरात पसरताच नागरिकांनी गर्दी केली होती. अल्का प्रमोद साखरे (वय.५१ ) असे मृतकाचे नाव आहे. दरम्यान मुतक अल्का साखरे या गायवाडी ग्रामपंचायतध्ये ५ वर्षं सरपंच म्हणून पदावर कार्यरत होत्या. गुरवारी घरी कुणी नसताना अल्का साखरे यांनी दुपारी तीन वाजताच्या सुमारास बेडरुममधील छताच्या पंख्याला साडीच्या मदतीने गळफास लावून आपली जिवनयांत्रा संपवली. घटनेची माहिती मिळताच दर्यापूर पोलीस स्टेशनचे पीएसआय हरिहर गोरे व पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.



# झी महासेल नव्या व्यवस्थापनात सज्ज

प्रतिनिधी २६ डिसेंबर

## ◆ एकाच छताखाली उत्तमोत्तम वस्तू उपलब्ध

**अकोला :** शहरातील गांधी चौकात उत्सव संकुलात नागरिकांच्या सेवेत अनेक वर्षांपासून कार्यरत 'झी महासेल' आता नव्या व्यवस्थापनांतर्गत पुन्हा एकदा ग्राहकांच्या सेवेसाठी सज्ज झाला आहे. झी महासेलमध्ये खरेदीसाठी नागरिकांची नेहमीच अलोट गर्दी असते. इतकेच नाही, तर आपल्या घरी आलेल्या पाहुण्यांनाही अकोलेकर मोठ्या आवडीने या ठिकाणी खरेदीसाठी घेऊन येतात; इतका विश्वास जी महासेलने मिळवला आहे. समाजातील सर्व स्तरांतील लोक येथे येतात. बजेटमध्ये खरेदी करणाऱ्या गृहिणींपासून ते लग्नकार्य,




गृहप्रवेश, वाढदिवस, गेट-टुगेदर किंवा शैक्षणिक साहित्यापर्यंत - येथे प्रत्येकासाठी काही ना काही खास नक्कीच आहे. झी महासेलमध्ये आल्यावर नेहमीच काहीतरी नवीन पाहायला मिळते. यामध्ये होम डेकोर आणि क्रॉकरी: घराची शोभा वाढवणारे साहित्य आणि स्टीलची भांडी, एथनिक आणि फेस्टिव्ह वेअर, रेडीमेड प्लाझो, लेगिंग्स, टॉप्स, टी-शर्ट्स, जेंट्स लोअर, बॉक्सर, बरमुडा, किड्स वेअर आणि नवनवीन खेळणी, ट्रेंडी फूटवेअर, स्टायलिश कॉस्मेटिक ज्वेलरी, गॉगल्स, परफ्यूम आणि घड्याळे, दिल्ली, मुंबई किंवा मोठ्या मॉल्समध्ये जे नवीन फॅशनेबल साहित्य सर्वात आधी येते, ते जी महासेलमध्ये नेहमी उपलब्ध असते. शहराच्या गांधी चौक सारख्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने, शहरातील तसेच ग्रामीण भागातून येणाऱ्या लोकांसाठी येथे पोहोचणे अतिशय सोपे आहे. सध्या जी महासेलमध्ये विशेष ऑफर सुरू असून ती मर्यादित कालावधीसाठी आहे. येथे वस्तूंची विविधता आणि उत्तम गुणवत्ता यामुळे ग्राहकांच्या पैशाचे पूर्ण समाधान मिळते. हे प्रतिष्ठान अकोला शहराची शान ठरले आहे. झी महासेल मध्ये एकाच छताखाली सर्व मनपसंत वस्तूंची खरेदी. प्रत्येक वेळी नवीन साहित्याचा साठा उपलब्ध. तर मग उशीर कशासाठी आजच आपल्या कुटुंबासह जी महासेलला भेट द्या आणि मनसोक्त खरेदीसह विशेष ऑफर्सचा लाभ घ्या.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK